POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-३०७ ● मुंबई, रविवार, ०८ जून २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## एकीकडे उद्धव ठाकरेंसोबतच्या युतीची चर्चा

# दुसरीकडे राज ठाकरेंनी दुसरा पत्ता उघडला

**युतीमुळं मविआचं काय होणार?**
उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येणार असल्याच्या चर्चेनं राज्याचं राजकारण ढवळून निघालं आहे. अशामध्ये स्वाभाविकपणे उद्धव ठाकरे महत्त्वाचा घटक असलेल्या महाविकास आघाडीचं काय होणार हा महत्त्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. दोन ठाकरेंनी एकत्र येणं नव्या राजकीय समीकरणाचा प्रारंभ ठरणार असेल, तर तीच महाविकास आघाडीच्या समारोपाची नांदी ठरणार नाही ना असा प्रश्नही आता विचारला जात आहे.



**■मुंबई | प्रतिनिधी :**
मनसेप्रमुख राज ठाकरे आणि ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे एकत्र येणार असल्याची चर्चा सुरु असतानाच राज ठाकरे यांच्या निवासस्थानी बैठकींचे धडाके सुरू आहेत. आज मनसेच्या केंद्रीय समितीची पुन्हा बैठक शिवतीर्थ या राज ठाकरे यांच्या निवासस्थानी पार पडली. २०१४ आणि २०१७ या निवडणुकानंतर पुन्हा एकदा २०२५ च्या मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे ब्रँड टिकवायला मनसेप्रमुख उद्धव ठाकरे आणि ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे एकत्र येतील ही चर्चा रंगली आहे. सलग तीन दिवसाच्या चर्चेनंतर मुंबईत राज आणि उद्धव ठाकरे एकत्र येण्याचे मराठी माणसाचे गळ घालणारे पोस्टर्स पाह्याला मिळत आहे. सोबत दोन्ही नेत्यांच्या मराठी माणसासाठी आणि महाराष्ट्रासाठी एकत्र येण्यासंदर्भात माध्यमांवर चर्चा केली. मात्र प्रत्यक्षात दोनही राजकीय पक्षांनी आपापल्या राजकीय ताकदीबाबत चाचपणी सुरू केली आहे.

**युतीच्या चर्चांसोबत 'एकला चलो रे'ची चाचपणी?**

शिवसेना ठाकरे गटाच्या मुंबई महापालिका शिवसेनेकडे ठेवण्यासंदर्भात हालचाली सुरू आहे. दुसरीकडे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनेही आपल्या विभाग अध्यक्ष, उपविभाग अध्यक्ष, गटनेते शाखाप्रमुख इत्यादीसोबत झालेल्या बैठकीचा अहवाल राज ठाकरे यांच्याकडे केंद्रीय समितीने सादर केला. ३६ विधानसभा मतदारसंघातील आढावा घेतल्यानंतर पक्षातील रिक्त पद, पक्षाची स्थिती, पक्षाकडे सध्या असलेली ताकद, पक्षाबाबत लोकांचा असलेला कल, आणि अपेक्षित बदल या सर्व गोष्टीचा लेखाजोगा राज ठाकरेंकडे अहवालाद्वारे मनसेच्या केंद्रीय समितीच्या नेत्यांनी सादर केला आहे. आगामी १३ जून २०२५ रोजी गटाध्यक्षांच्या केंद्रीय समितीची बैठक होईल. सोबतच मतदार संघाबाबतही नवे अहवाल सादर होतील, अशी माहिती समोर आली आहे.

**मनसेच्या बैठकीची इनसाईड स्टोरी-**

- मनसेप्रमुख राज ठाकरे आणि ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे एकत्र येणार असल्याची चर्चा सुरु असतानाच राज ठाकरे यांच्या निवासस्थानी बैठकींचे धडाके सुरू आहेत. आज मनसेच्या केंद्रीय समितीची पुन्हा बैठक शिवतीर्थ या राज ठाकरे यांच्या निवासस्थानी पार पडली.
- आजच्या बैठकीत केंद्रीय समिती च्या गटाध्यक्षांसोबत राज ठाकरे यांनी चर्चा केली आहे.
- केंद्रीय गटाध्यक्षांची जबादारी ही बाळा नांदगावकर यांच्यावर आहे. त्यासोबत मुंबई अध्यक्ष संदीप देशपांडे आणि इतर केंद्रीय समितीच्या नेत्यांसोबत राज ठाकरे यांनी चर्चा केली आणि आढावा घेतला आहे.
- स्थानिक स्वराज्य संस्थेच्या पार्श्वभूमीवर मनसेने २२७ मतदार संघाचा आढावा आणि अहवाल तयार केला आहे तो अहवाल आज राज ठाकरे यांच्या पुढे मांडण्यात आला आहे.
- या अहवालात काही सकारात्मक मतदार संघ आहेत असेही राज ठाकरे यांच्या समोर मांडण्यात आलेल आहे. नाशिक-मुंबई-पुणे यांना सोडून इतर काही मतदार संघाची रूपरेषा उभारण्यात आली आहे.
- या मतदारसंघातून आता उपाध्यक्ष आणि गटाध्यक्ष यांच्याकडून आढावा घेऊन हा अहवाल तयार करण्यात आला आहे.
- पहिला राउंड केल्यानंतर आणखी दोन राउंड करण्यात येणार आहे यावेळी नेटव मांडली ही ग्राउंड वर जाऊन लोकांसोबत चर्चा करतील.
- पुन्हा एखदा मतदार संघांवत चर्चा आणि नवे अहवाल घेऊन आता १३ जूनला गटाध्यक्षांच्या केंद्रीय समितीची बैठक पार पडेल.
- आज बैठकील बाळा नांदगावकर, कर्णबाळा दूनबळे, संदीप देशपांडे, अविनाश जाधव आणि यशवंत किल्लेदार जी नेते मंडळी उपस्थित होती.

### राज-उद्धव एकत्र या, शिंदेंची शिवसेना ही भाजपप्रणित

## गजानन किर्तीकरांची ५ मोठी वक्तव्य!

**कीर्तीकरांची ५ मोठी वक्तव्य**

- राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र यावं ही काळाची गरज आहे.
- राज ठाकरे, उद्धव ठाकरे यांच्यासोबत एकनाथ शिंदे यांनी सुद्धा एकत्र येऊन अखंड शिवसेना तयार करावी.
- सध्या एकनाथ शिंदे यांची शिवसेना भाजप प्रणित आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना ही काँग्रेस प्रणित आहे.
- बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराने पुढे जाणारी शिवसेना एकनाथ शिंदे यांची वाटत होती. मात्र, तसं होताना दिसत नाही.
- बाळासाहेब ठाकरे यांना वाटायचं की राज आणि उद्धव यांनी एकत्र यावं. राज ठाकरे हे शिवसेनेतून निघून गेल्यानंतर मोठे शिवसेनेचे नुकसान झालं.



**■पुणे | प्रतिनिधी :**
मुंबई : मनसे प्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी एकत्र यावं ही महाराष्ट्रातील दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांची इच्छा आहे. गेल्या अनेक वर्षांपासून दोन्ही नेते एकत्र येण्याची चर्चा जोर धरते, पण एक होताना दिसत नाही. मात्र, आगामी स्थानिक स्वराज्य संस्था व मुंबई महापालिका निवडणुकांच्या अनुषंगाने दोन नेत्यांनी एकत्र यावे, अशी भावनिक साद घातली जात आहे.

तर, दुसरीकडे या दोन्ही नेत्यांची वक्तव्ये देखील अनुकूल दिसून येत आहेत. त्यातच, आता शिवसेना शिंदे गटातील नेते आणि दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्यासमवेत काम केलेले ज्येष्ठ नेते गजानन कीर्तीकर यांनी शिवसेना-मनसे एकत्र येण्याबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. उद्धव आणि राज यांनी एकत्र यावं ही बाळासाहेबांची इच्छा होती, असे कीर्तीकर यांनी म्हटलं. तसेच, सध्याची एकनाथ शिंदेंची शिवसेना ही भाजप प्रणित बनल्याचंही त्यांनी म्हटलं.

शिवसेना शिंदे गटाचे नेते गजानन कीर्तिकर यांनी शिवसेना-मनसे यांच्या एकत्र येण्याबाबत मोठं वक्तव्य केलंय. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र यावं ही काळाची गरज आहे. राज ठाकरे, उद्धव ठाकरे यांच्यासोबत एकनाथ शिंदे यांनी सुद्धा एकत्र येऊन अखंड शिवसेना तयार करावी. कारण, सध्या एकनाथ शिंदे यांची शिवसेना भाजप प्रणित आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना ही काँग्रेस प्रणित आहे.

बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराने चालणारी शिवसेना आता हवी आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराने पुढे जाणारी शिवसेना एकनाथ शिंदे यांची वाटत होती. मात्र, तसं होताना दिसत नाही, असे म्हणत गजानन कीर्तीकर यांनी एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात चालणाऱ्या शिवसेना पक्षावर घणाघाती टीका करत शिंदेंना घरचा अहेर दिलाय. बाळासाहेब ठाकरे यांना वाटायचं की राज आणि उद्धव यांनी एकत्र यावं. राज ठाकरे हे शिवसेनेतून निघून गेल्यानंतर मोठे शिवसेनेचे नुकसान झालं. शिंदे यांची शिवसेना ही भाजप प्रणित यासाठी कारण ते सध्या एनडीए मध्ये आहेत.



## मुंबईकर म्हणतायत भाजपा सर्वात पुढे

### ठाकरे गटाचे काय? राज-उद्धव एकत्र आले तर काय?

**■मुंबई | प्रतिनिधी :**
मुंबईतील आगामी बीएमसी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जनमताचा आढावा घेणारे सर्वेक्षण विकली वाईबने केले आहे. या सर्व्हेक्षणातील आकडेवारी मनोरंजक आहे. येऊ घातलेल्या मुंबई महानगर महापालिका निवडणूकांत सत्ता मिळवण्याच्या शर्यतीत भाजपा सर्वात आघाडीवर आहे. तर शिवसेनेत फूट पडून देखील उद्धव ठाकरे यांचा करिष्मा अजूनही कायम असल्याचे आकडेवारी या सर्वेक्षणात पुढे आली आहे. नगरसेवक आणि प्रशासक दोन्हींच्या प्रगती पुस्तकावर मुंबईकरांनी लाल शेरे मारलेले आहेत आणि महत्वाचे म्हणजे बाळासाहेब ठाकरे यांचा वारसा चालविण्यासाठी उद्धव आणि राज एकत्र आले तर त्यांना मुंबईकरांचा मोठा पाठिंबा या सर्वेक्षणातून मिळाला आहे.

- **या सर्वेक्षणात तुमच्या स्थानिक नगरसेवकाच्या कामगिरीवर खुश आहात काय?**
  - अशा विचारलेल्या प्रश्नावर तब्बल २८.९ टक्के मुंबईकरांनी संपूर्ण असमाधानी असे म्हटले आहे. तर २०.९ टक्के मुंबईकरांनी नगरसेवकांची कामगिरी संपूर्ण समाधानी असल्याचे म्हटले आहे. १८.७ समाधानीही नाही आणि असमाधानीही नाही असे म्हटले आहे. तर १२.२ टक्के मुंबईकरांनी सांगू शकत नाही असे म्हटेल आहे. वयोगटाचा विचार करता १८-२४ वयोगटातील ३९ टक्के तरुणांनी स्थानिक नगरसेवकांची कामगिरी समाधानकारक असे म्हटले आहे.तर नगरसेवकांची कामगिरी असमाधानकारक असल्याचे २५-३४ वयोगटातील ३६ टक्के तरुणांनी म्हटले आहे.
- **मुंबई महापालिकेचा शिवसेनेचा महापौर असतानाच्या साल २०१७ ते २०२२ च्या काळाच्या तुलनेत आताची एनडीएची प्रशासकीय राजवट कशी आहे का ?**
  - या प्रश्नाला २०.० टक्के मुंबईकरांनी सर्वात वाईट असे म्हटले आहे. तर १९.९ टक्के मुंबईकरांनी बऱ्याच प्रमाणात चांगली म्हटले आहे. तर १७.१ टक्के मुंबईकरांनी सारखीच असल्याचे म्हटले आहे. पालिकेतील एनडीएची प्रशासकीय राजवट आधीपेक्षा चांगली म्हणणाऱ्यात ४३ टक्के पुरुष तर ३२ टक्के महिला आहेत. वाईट म्हणणाऱ्यात पुरुष आणि महिलांचे प्रमाण ३६ टक्के असे समान आहे. वयोगटाचा विचार करता आताची प्रशासकीय राजवट आधीपेक्षा उत्तम असल्याचे ५५ वयोगटाच्या पुढील ५० टक्के नागरिकांनी म्हटले आहे.
- **जर बीएमसीच्या निवडणूका सर्व पक्षांनी स्वतंत्रपणे लढल्या कोणाला पाठींबा?**
  - या प्रश्नावर ३१.० टक्के लोकांनी भाजपाला पाठींबा दिला. तर २३.९ टक्के लोकांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला पाठिंबा देणार असे म्हटले आहे. तर एकनाथ शिंदे यांना ६.३ टक्के लोकांना पाठींबा दर्शवला आहे. तर मनसेला ११.२ टक्के लोकांनी पाठींबा दिला आहे.
- **मुंबईकरांना कोणती समस्या अधिक महत्वाची वाटतोय ?**
  - अनुक्रमे रस्त्यावरील खड्डे - १९.५ टक्के, पाणी तुंबणे - १४.३ टक्के, वाहतूक समस्या - १०.६ टक्के, अपुरी शौचालय - १६.१ टक्के, पिण्याची पाणी - ११.१ टक्के, झोपडपट्टी - ४.७ टक्के, इतर - ९.६ टक्के, सांगू शकत नाही - १४.३ टक्के अशी प्रतिक्रीया दिली आहे.
- **बाळासाहेब ठाकरे यांचा वारसा चालण्यासाठी राज आणि उद्धव ठाकरे एकत्र आले तर पाठींबा द्याल का?**
  - या प्रश्नावर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला - २६.२ टक्के, राज आणि उद्धव ठाकरे युती - ५२.१ टक्के, काही सांगू शकत नाही असे २१.८ टक्के लोकांनी म्हटले.

## राज्यात मान्सून पुन्हा सक्रिय होताच आठवड्याचा शेवट वादळी पावसानं

**■मुंबई | प्रतिनिधी :**
मोठ्या सुट्टीवर गेलेला पाऊस आता पुन्हा एकदा सक्रिय होताना दिसत आहे. धीम्या गतीनं मान्सून सक्रिय होत असून, राज्याच्या काही भागांमध्ये त्यामुळं पावसाच्या सरी कोसळण्यास सुरुवात होण्याची चिन्हं आहेत.

ज्येष्ठ हवामान तज्ज्ञांच्या माहितीनुसार पुढील २४ तासांमध्ये मध्य महाराष्ट्रातील, कोकण-गोवा आणि मराठवाड्यातील तुरळक जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाची शक्यता आहे. यादरम्यान ताशी ३० ते ४० किमी वेगाने वारे वाहणार असून पावसाच्या हलक्या ते मध्यम स्वरुपातील सरींचीसुद्धा हजेरी असेल. गेल्या काही दिवसांपासून नैऋत्य मोसमी वारे एकाच जागेवर स्थिरावल्यामुळं मोसमी पावसाचा जोर कमी झाला. मात्र त्यामुळे अधूनमधून काही भागांमध्ये पावसाच्या हलक्या सरीसुद्धा बरसल्या.



हवामानाच्या या प्रणालीचा परिणाम अगदी घाटमाथ्यावरही होणार असून, तिथं शनिवारी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. तर, मुंबईसह ठाणे, पालघर, रायगड भागात हलक्या ते मध्यम सरींचा अंदाजही हवामान विभागानं व्यक्त केला आहे. शनिवारी घाटमाथ्यावर मेघगर्जनेसह पावसाची शक्यता असून, पुणे, सातारा, सांगली या भागात वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. याशिवाय सोलापूर, धाराशिव, अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूरमध्ये विजांच्या कडकडाटासह पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

**मोसमी वारे पुन्हा सक्रिय होणार**

विश्रांतीवर असणारे मोसमी वारे पुन्हा सक्रिय होण्यास परिस्थिती आणि वातावरण अनुकूल अलून, जून महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यानंतर राज्याच्या दक्षिणेकडील भागांमध्ये चांगल्या पावसाची शक्यता आहे. पुढे जुनच्या अखेरीपासून अगदी जुलै महिन्याच्या सुरुवातीपर्यंतसुद्धा पाऊस सरासरीहून जास्त असेल असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**नागपुरात तापमान चाळीशीपार...**
राज्यात एकिकडे पावसाची चिन्हं असली तरीही दुसरीकडे मात्र उकाडा वाढतच जात असल्याचं पाहायला मिळत आहे. ज्यामुळं राज्यातील तापमानाच विभिन्नता दिसून येतेय. मागील २४ तासांमध्ये राज्यात ब्रम्हपुरी इथं सर्वाधिक तापमानाची नोंद करण्यात आली. जिथं आकडा ४२.४ अंश इतका होता. तर, नागपूरमध्ये तापमान ४१.८ अंश इतका असल्याची नोंद झाली. मुंबईतही चित्र वेगळं नसून इथं तापमान ३२ ते ३३ अंशांदरम्यान असल्याचं पाहायला मिळालं. हवेतील आर्द्रतेमुळं इथं उष्मा अधिक जाणवला. राज्यातील हवामानाची ही स्थिती येत्या काही दिवसांत स्थिर राहते की त्यात आणखी काही बदल होतात हे पाहणं महत्त्वाचं ठरेल.

### महाराष्ट्रात काय चाललंय? ‘मुलगी झाली म्हणून...’

## सुसंस्कृत पुण्याला गालबोट लावणारी घटना!

**■पुणे | प्रतिनिधी :**
मुलगी नकोय ही बुरसटेली मानसिकता पुन्हा एकदा डोकं वर काढू लागली आहे. मुलगी जन्मला आली म्हणून बीडच्या माहेरवासिनीला चक्क १५ दिवस उपाशीपोटी डांबून तिचा छळ करण्यात आला. धक्कादायक गोष्ट म्हणजे ही घटना सुसंस्कृत मानल्या जाणाऱ्या पुण्यात घडली आहे.

पीडितेचा विवाह पुण्यातील पिंपळ सौदागर इथल्या आयटी क्षेत्रात काम करणाऱ्या निहाल चंदनशिवे याच्यासोबत झाला. लग्नाच्या काही वर्षांनंतर तिनं गोंडस मुलीला जन्म दिला. तर मुलीच्या जन्मापासूनच तिचा छळ सुरु झाला. मुलीला जन्म दिला म्हणून पती, सासू-सासरा आणि दिरानं मानसिक आणि शारिरिक छळ केला. आपल्या मुलीचा अमानुष छळ करणाऱ्या राक्षसी वृत्तीच्या लोकांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी पीडितेच्या आईनं केली आहे.

'मुलगी नको' या बुरसटेल्या मानसिकतेनं पुन्हा एकदा डोकं वर काढलंय. मुलगी जन्माला आली म्हणून पुण्यातील चंदनशिवे कुटुंबानं आपल्या सुनेचा अमानुष छळ केलाय. या कुटुंबानं आपल्या सुनेला चक्क १५ दिवस उपाशीपोटी डांबून ठेवलं. पदरात बाळ आहे या विचाराने ती कित्येक महिने हा छळ सहन करत राहिली. मात्र, अखेर तिची सहनशक्ती संपली आणि एकेदिवशी घरी कुणीही नाही हे लक्षात येताच तिनं मुलीसह त्या छळछावणीतून पळ काढला. त्यानंतर ही पीडित महिला बीडमध्ये माहेरी गेली. पीडितेनं बीडच्या शिवाजीनगर पोलिसांत सासरच्यांविरोधात तक्रार दाखल केली आहे. आता सासरच्या ४ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



शिवानीच्या तक्रारीनंतर बीड पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. लवकरच या आरोपींना अटक करण्याचं आश्वासन पोलिसांनी दिलंय. तसंच कौटुंबिक हिंसाचाराविरोधात आवाज उठवा, पुढे येऊन तक्रार द्या असं आवाहनही पोलिसांनी केलंय.

पुण्यातील वैष्णवी हगवणे हुंडाबळी प्रकरणानंतर महिलांवरील कौटुंबिक हिंसाचाराचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आलाय. पुण्यातील आणखी एका घटनेनं महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी असणाऱ्या पुण्याला पुन्हा काळा डाग लागलाय. कधी हुंडा दिला नाही म्हणून छळ, कधी हुंडा कमी दिला म्हणून छळ, तर कधी मुलगी झाली म्हणून छळ... या हगवणे आणि चंदनशिवेंसारख्या वाईट वृत्तीच्या लोकांमुळे अनेक स्त्रीया आपला जीव गमावतायत. त्यामुळे ही विकृत मानसिकता वेळीच ठेचायची गरज आहे.

## गडचिरोलीत आत्मसमर्पित १३ नक्षलवादी युवक-युवतींचं शुभ मंगल सावधान

### मुख्यमंत्र्यांकडून आशीर्वाद, पोलीस बनले वऱ्हाडी

**■गडचिरोली | प्रतिनिधी :**
लग्न हा प्रत्येकाच्या आयुष्यातील आनंदाचा आणि सुखाचा क्षण असतो. त्यामुळेच, मित्र-परिवार, नातेवाईक, सहकारी सर्वजणांच्या साक्षीने या आनंदाच्या सोहळ्याचे सेलिब्रेशन होत असते. गरिबापासून श्रीमंतांपर्यंत प्रत्येकाच्या जीवनात हा क्षण सदैव आठवणीत राहणारा असतो. मुलगा थोडा वाईट वागत असेल, किंवा जबाबदारीने वागत नसेल तर घरचे म्हणतात, याचं लग्न लावून द्या म्हणजे सुधारेल. मात्र, गडचिरोलीतील नक्षलवादी लग्नाआधीच चांगल्या मार्गावर आले असून त्यांनी आत्मसर्पण केलं आहे. या आत्मसमर्पण केलेल्या १३ नक्षल युवक-युवतींचा लग्नसोहळा मोठ्या उत्साहात आणि पोलिसांच्या साक्षीने संपन्न होत आहे. विशेष म्हणजे गडचिरोली पोलीस मुख्यालयात चक्क मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत येथे शुभ मंगल सावधान म्हणत अक्षता पडणार आहेत.



गडचिरोली पोलीस दलातर्फे आत्मसमर्पित नक्षलवादी युवक युवतींचा सामूहिक विवाह सोहळा आयोजित केला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हा आगळावेगळा लग्नसोहळा संपन्न होत आहे.

गडचिरोली पोलीस दलातर्फे आत्मसमर्पित नक्षलवादी युवक युवतींचा सामूहिक विवाह सोहळा आयोजित केला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हा आगळावेगळा लग्नसोहळा संपन्न होत आहे. जवळपास १३ आत्मसमर्पित नक्षल युवक युवती या विवाह सोहळ्यातून लग्न बंधनात अडकणार आहेत. तत्पूर्वी गडचिरोली पोलीस दलाच्या बँड पथकाद्वारे पोलीस मुख्यालय परिसरातून वर-वधुंची वाजत गाजत वरात काढण्यात आली. या वरातीत पोलीस कर्मचारी वऱ्हाडी बनवून सहभागी झाले होते. विवाह बंधनात अडकणाऱ्या मोस्ट वॉन्टेड नक्षली गिरीधरसह नक्षल युवक-युवतींनी या लग्न सोहळ्याबद्दल आनंद व्यक्त केला आहे.

वर्षानुवर्षे घनदाट जंगलात बंदुकीच्या जोरावर क्रांती घडवू पाहणाऱ्या अनेक नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पणाची वाट धरली आहे. त्यामुळे त्यांच्या जीवनात विकासाची नवीन पहाट उजाडली आहे. गडचिरोली पोलिसांनी या आत्मसमर्पित नक्षलवाद्यांची रेशीमगाठ जुळवून आणली असून आज मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत आत्म समर्पित नक्षलवाद्यांचा सामूहिक विवाह सोहळा गडचिरोलीच्या पोलीस मुख्यालयात पार पडत आहे. पोलीस मुख्यालयातील शहीद पांडू अलाम सभागृहात हा विवाह सोहळा संपन्न होत असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सहपालकमंत्री आशिष जयस्वाल यांच्यासह गणमान्य नागरिक उपस्थित राहणार आहेत. नव विवाहित नक्षल दांपत्यांना मुख्यमंत्री स्वतः शुभ आशीर्वाद देणार असून विविध साहित्याचे वाटपही करणार आहेत.

## नको त्या कारणासाठी बारामती चर्चेत

### बड्या जिमसमोर उभ्या असणाऱ्या कारमध्ये जे सापडलं ते...

**■बारामती | प्रतिनिधी :**
एरव्ही राजकीय कारणांमुळं चर्चेत असणारं बारामती यावेळी मात्र नको त्या कारणामुळं चर्चेत आलं असून, एका मोठ्या प्रकणाच्या तपासाला यामुळं चालना देण्यात पोलिसांना मोठं यश मिळालं आहे. नुकत्याच समोर आलेल्या माहितीनुसार बारामती शहर पोलिसांनी मेंफेंटरमाईन सल्फेट इंजेक्शनचा अवैध साठा पकडला आहे.

बारामती शहरातील भिगवण रोडवरील एका उच्चभ्रू जीमसमोर उभ्या असणाऱ्या क्रेटा कारमधून पोलिसांनी मेंफेंटरमाईन सल्फेट इंजेक्शनच्या तब्बल ९० सिलबंद बाटल्या हस्तगत केल्या. व्यायामशाळेत शरीरसौष्ठव करणाऱ्यांना इंजेक्शनचा पुरवठा होत असल्याचा संशय होता, त्यातूनच पोलिसांनी ही कारवाई करण्यात आली आहे. सदर प्रकरणातून बारामती शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, एकाला ताब्यात देखील घेण्यात आलं आहे. तन्मय कल्याण बनकर राहणार सहयोग सोसायटी समोर बारामती, याला ताब्यात घेण्यात आलं आहे. तर त्याचा मित्र राहुल उघाडे हा फरार आहे.



दरम्यान, बारामती शहरातील काही व्यायामशाळा मध्ये शरीरसौष्ठव करणाऱ्या तरुणांना भूलशास्त्रज्ञ प्रसूतीच्या वेळी वापरतात ते मेंफेंटरमाईन सल्फेट इंजेक्शन घेण्यासाठी काहीजण प्रोत्साहित करतात अशी चर्चा गेल्या काही महिन्यांपासून सुरूच होती. मात्र ठोस असा कोणताही पुरावा समोर येत नव्हता. त्यामुळं अखेर या प्रकरणाचा बारामती शहर पोलिसांनी आता भांडाफोड केला आहे.

**लाखोंचा मुद्देमाल...**

बारामती शहर पोलिसांनी केलेल्या या कारवाईत पोलिसांनी तब्बल २९ हजार १८४ रुपये किमतीच्या मेंफेंटरमाईन सल्फेट इंजेक्शन च्या ९० सीलबंद बाटल्या आणि ५ लाख रुपये किमतीची एक चार चाकी कार असा मुद्देमाल हस्तगत केला आहे. पोलिसांनी जप्त केलेली इंजेक्शन संबंधित व्यक्तीने कुठून आणली? कोणत्या उद्देशाने आणली? तो कोणाला इंजेक्शनचा पुरवठा करणार होता? या रॅकेटमध्ये आणखीन कोण कोण सहभागी आहेत? याची कसून चौकशी आता बारामती शहर पोलीस करत आहेत.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# महाराष्ट्राचा 'वेग्'विलास

**अडीच दशकांपूर्वी पुणे-मुंबई द्रुतगती मार्गापासून रस्त्यांबाबत राज्यात सुरू झालेल्या प्रवासातील हा आणखी एक महत्त्वाचा टप्पा म्हणावा लागेल. वाहतुकीची साधने आणि विकास यांचे नाते पूर्वीपासून असले, तरी महाराष्ट्रात याची चाहूल अंमळ उशिराच लागली.**

राजधानी मुंबई आणि उपराजधानी नागपूर यांना अधिक जवळ आणणाऱ्या 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गा'चे बहुप्रतीक्षित स्वप्न अखेर पूर्ण झाले. अडीच दशकांपूर्वी पुणे-मुंबई द्रुतगती मागार्पासून रस्त्यांबाबत राज्यात सुरू झालेल्या प्रवासातील हा आणखी एक महत्त्वाचा टप्पा म्हणावा लागेल. वाहतुकीची साधने आणि विकास यांचे नाते पूर्वीपासून असले, तरी महाराष्ट्रात याची चाहूल अंमळ उशिराच लागली. राज्यस्थापनेनंतर पहिल्या काही दशकांमध्ये शेती आणि ग्रामीण विकास यांवर राज्याचा भर राहिला. मात्र, काळाच्या ओघात शेतीला वाढत्या लोकसंख्येचा भार पेलवेनासा होऊ लागला. शेतीतील उत्पन्न-रोजगार आक्रसू लागले आणि अन्य क्षेत्रांमध्ये रोजगारनिर्मितीशिवाय विकास नाही, हे वास्तव समोर आले. त्याच काळात खुल्या अर्थव्यवस्थेमुळे उत्पादन-सेवा क्षेत्रांमध्ये शिक्षण आणि रोजगाराची कवाडे उघडली आणि महाराष्ट्रातही मुंबई-पुण्याच्या पलीकडे विकासाच्या केंद्रांचा विस्तार होऊ लागला. याच काळात तेव्हाचे महाराष्ट्रातील मंत्री नितीन गडकरी यांच्या पुढाकाराने देशातील पहिलावाहिला द्रुतगती महामार्ग उभा राहिला; त्यातून या पट्ट्याने औद्योगिकीकरण आणि शहरीकरणातून होणाऱ्या विकासाचे नवे मॉडेल राज्याला दाखवले. महाराष्ट्राच्या दोन्ही टोकांना जोडणारा समृद्धी महामार्ग हे याच विकासयात्रेतील नवे वळण मानले पाहिजे. ठाण्यापासून ते नाशिक, विदर्भ आणि मराठवाड्यातील दहा जिल्ह्यांमधून जाणाऱ्या आणि २४ जिल्ह्यांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष लाभ मिळवून देणाऱ्या ७०१ किलोमीटर लांबीच्या या महामार्गाची अनेक वैशिष्ट्ये आहेत. या महामार्गामुळे नाशिकबरोबरच विदर्भ-मराठवाड्याच्या विकासाला मोठी चालना मिळणार आहे. हा मार्ग भविष्यात वाढवण बंदराला जोडण्याची घोषणा झाली आहे. त्यामुळे या सर्व भागातील शेतीमालासाठी मुंबईसह जागतिक बाजारपेठही खुली होईल. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांनी ग्रासलेल्या विदर्भ-मराठवाड्यातील अविकसित भागाकडे यामुळे आर्थिक ओघ वळू शकतो आणि 'मिहान'सारख्या केंद्रांमधील उत्पादनांचे वितरण सुलभ होऊ शकते. त्याबरोबरच धार्मिक यात्रा आणि पर्यटन यांतून अनेक गावे-शहरांचा चेहरामोहरा पालटण्याची क्षमता अशा प्रकल्पांमध्ये आहे. या प्रकल्पाचा आजवरचा प्रवास मुळीच सोपा नव्हता. भूसंपादनापासून ते राजकीय विरोध, आर्थिक अडचणी आणि तांत्रिक आव्हानांचे अनेक काटे या मार्गावर पसरलेले होते; मात्र राजकीय इच्छाशक्तीच्या बळावर त्यातून वाट काढत हा प्रकल्प पूर्णत्वास नेण्याचे श्रेय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार या त्रयीसह अभियंते-तंत्रज्ञांपासून सर्वसामान्य कामगारांनाही दिले पाहिजे. या प्रकल्पाच्या पूर्ततेनंतर शक्तिपीठ महामार्गाला गती देण्याची घोषणा मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली आहे. त्यासाठी पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमधून होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांच्या विरोधातून मार्ग काढावा लागेल. समृद्धी महामार्गाचा खर्च तब्बल ६१ हजार कोटी रुपयांवर, म्हणजे नियोजित खर्चापेक्षा प्रचंड वाढला आहे. भूसंपादनाचे नवे नियम आणि कालापव्ययासह अन्य आर्थिक कारणे त्यामागे असली, तरीसुद्धा हा वाढता खर्च ही अर्थकारणाच्या दृष्टीने चिंतेची बाब ठरते. 'समृद्धी'च्या फुगलेल्या खर्चाबाबत आरोप करून काँग्रेसने श्वेतपत्रिका काढण्याची मागणी केली आहे. नुकताच घोडबंदर ते भाईंदर मार्गाचा खर्च तीन हजार कोटी रुपयांनी वाढल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने कानउघाडणी केली आहे, तसेच पुण्याच्या रिंग रोडसाठीही अव्वाच्या सव्वा खर्चाची उड्डाणे झाल्याचे आरोप होत आहेत. त्यामुळे सरकारने योग्य आर्थिक ताळमेळ बसवून खर्चाच्या 'गळती'ला आणि मलिद्यावर डोळा ठेवणाऱ्यांना चाप लावला पाहिजे. या वाढत्या खर्चाच्या भरपाईसाठी टोलचा भुर्दंड दिवसेंदिवस वाढत असल्याने वाढत्या जनरोषाची दखल सरकारला घ्यावीच लागेल. दुसरीकडे 'मुंबई ते नागपूर आठ तासांत' अशा प्रकारच्या घोषणांमधून वाहनांचा वेग भयप्रद पद्धतीने वाढला असून, प्राणघातक अपघातांचे प्रकार वारंवार घडत आहेत. त्याबाबत खबरदारीचे योग्य उपाय आणि वाहनचालकांना प्रशिक्षण-प्रबोधनाचीही व्यवस्था केली पाहिजे. काही दिवसांपूर्वी या महामार्गाच्या पूर्वीच्या टप्प्यांवर रस्त्यावर खड्डे-तडे पडल्याचे समोर आले. प्रचंड वेगाने जाणाऱ्या वाहनांसाठी ते अपघातांना निमंत्रण ठरू शकते, त्यामुळेच या मार्गाच्या देखभाल-दुरुस्तीकडेही लक्ष द्यावे लागेल.

# प्लास्टिकचा कहर, निसर्गातील जहर

**प्लास्टिकचा वापर औद्योगिक क्रांतीनंतर प्रचंड वाढला आहे, मात्र त्याचे दुष्परिणाम गंभीर आहेत. विघटन न होणाऱ्या प्लास्टिकमुळे समुद्र, नद्या आणि जमीन प्रदूषित होत आहेत. अनेक सागरी जीव, पक्षी आणि प्राणी प्लास्टिक खाऊन मृत्युमुखी पडतात. सूक्ष्म प्लास्टिक अन्न व पाण्यात मिसळून मानवाच्या आरोग्यावर परिणाम करते. त्यामुळे पर्यावरण व आरोग्य वाचवण्यासाठी शाश्वत पर्याय स्वीकारणे आणि प्लास्टिक वापर बंद करणे आवश्यक आहे.**



फार प्राचीन काळापासून नैसर्गिक रेझिन आणि इतर वनस्पतिजन्य पदार्थ वापरले जात होते. १८६२मध्ये अलेक्झँडर पार्क्सने सेल्युलोज नायट्रेट आणि कापूर मिसळून पहिले कृत्रिम प्लास्टिक विकसित केले. १८९७मध्ये डब्लू क्रीश यांनी दुधाच्या प्रथिनांपासून प्लास्टिक तयार केले. १९०७मध्ये सेल्युलोज नायट्रेट वापरून टेबल टेनिस बॉल तयार करण्यात आला, तेव्हापासून हळूहळू प्लास्टिकचा वापर वाढू लागला. इतका की चीनची ग्रेट भिंत किंवा पिरॅमिड्स यांच्याबरोबरीने स्पेनच्या किनाऱ्यावर साठलेल्या पांढऱ्या प्लास्टिकचा मोठा भाग अवकाशातून दिसतो.

एकविसाव्या शतकात आपल्या दैनंदिन जीवनात प्लास्टिकचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला. त्याचे जेवढे फायदे आहेत, त्यापेक्षा तोटे मोठे आहेत. त्याचा एक मोठा तोटा हा की निसर्गामध्ये या प्लास्टिकचे विघटन होत नाही. पृथ्वीवरील सर्व स्तरांवर प्लास्टिकचे साठे वाढत चालले आहेत. एकूण प्लास्टिक चक्क ८३० कोटी टन - म्हणजे प्रतिमाणशी दीड कोटी टन इतके! प्लास्टिकच्या प्रदूषणाने समुद्र, नद्या, जमिनी प्रभावित झाल्या आहेत. या परिणामांबाबत लोकांना म्हणजे एकूणच ग्राहकांना सजग करण्यासाठी ५ जून हा दिवस दर वर्षी पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जातो. २०२५ च्या जागतिक पर्यावरण दिनाची थीम 'जागतिक स्तरावर प्लास्टिक प्रदूषणाचा अंत' आहे. ही थीम प्लास्टिक कचऱ्याच्या पर्यावरणावर होणाऱ्या व्यापक परिणाम दर्शवते. नागरिकांना ते परिणाम कमी करण्यासाठी करण्यास प्रेरणा देते. केवळ नागरिकच नाही तर सरकार आणि संस्थांनाही शाश्वत पद्धती स्वीकारण्यास प्रेरणा देते. ही मोहीम प्लास्टिक कचऱ्याच्या व्यापक परिणामांवर प्रकाश टाकते, ज्यामध्ये महासागर आणि जलमार्ग प्रदूषित होण्यापासून ते सूक्ष्म प्लास्टिकच्या स्वरूपात आपल्या अन्न प्रणालींमध्ये प्रवेश होण्यापर्यंतचा समावेश आहे.

प्लास्टिकमुळे काही प्रजाती नष्ट होतात आणि समुद्रातील जीवविविधता कमी होते. अन्नसाखळीत बदल झाले आहेत. पर्यावरणावर परिणाम - प्लास्टिकमुळे समुद्रातील पाण्याची आणि जमिनीची गुणवत्ता बिघडते.

प्लास्टिक खाऊन किंवा त्यात अडकून दर वर्षी लाखो समुद्री पक्षी आणि कासवे मरतात.

काही सागरी प्रजातींच्या पोटांमध्ये मोठ्या प्रमाणात प्लास्टिक कचरा आढळतो, ज्यामुळे त्यांचे आरोग्य बिघडते. जमिनीवरील प्राणी गाई म्हशी यांच्याही पोटात कितीतरी टन प्लॅस्टिक आढळले अशा मधून मधून बातम्या येतात.

प्लास्टिकमुळे समुद्रातील परिसंस्थेचे संतुलन बिघडते, ज्यामुळे काही प्रजाती नष्ट होऊ शकतात.

प्लास्टिक प्रदूषणामुळे पक्षी अनेक प्रकारे त्रस्त होतात. प्लास्टिक खाल्ल्याने किंवा त्यात अडकल्याने अनेक समस्या येतात. उदा. उपासमार, आजार आणि मृत्यू. एका अभ्यासानुसार दर वर्षी अंदाजे १० लाख पक्षी प्लास्टिकमुळे मरतात.

काही पक्षी प्लास्टिकला अन्न समजून खातात, ज्यामुळे त्यांना पोट भरल्यासारखे वाटते आणि ते योग्य अन्न खाणे बंद करतात, त्यामुळे उपासमार होते.

प्लास्टिकच्या रिंग्स, पिशव्या किंवा इतर वस्तू पक्ष्यांच्या पायांमध्ये किंवा घशात अडकल्यास त्यांना हालचाल करणे किंवा श्वास घेणे कठीण होते.

प्लास्टिकच्या सेवनामुळे पक्षी त्यांच्या पिलांना योग्य पोषण देऊ शकत नाहीत, ज्यामुळे पिल्लांचा विकास थांबतो.

सूक्ष्म प्लास्टिकचे कण पाण्यामध्ये मिसळून पक्ष्यांना आणि इतर सागरी जिवांना हानिकारक ठरतात. त्यामुळे त्यांची रोगप्रतिकारशक्ती कमी होते आणि ते आजारी पडतात.

प्लास्टिक मानवालाही घातक आहे. बिस्फेनॉल फॅथलेट्स यासारखी रसायने आतड्यांवर परिणाम करतात. मायक्रोप्लास्टिक कचरा लहान लहान कणांमध्ये रूपांतरित असल्याने अन्न, पाणी, हवेतून तो शरीरात जातो. प्लास्टिकच्या डब्यातून अन्न व पाणी दूषित होते. याचा परिणाम फुप्फुसांवर होतो कर्करोगाचा धोका वाढतो.

पर्यावरणावर व मानवाला धोका पोहोचत असल्याने खऱ्या अर्थाने प्लास्टिक बंद करणे गरजेचे आहे. प्लास्टिकचा वापर पूर्णपणे बंद करणे शक्य नाही. प्लास्टिक हे अनेक उद्योगांमध्ये आवश्यक आहे. प्लास्टिकचा वापर कमी करणे शक्य आहे, पण पूर्णपणे बंद करणे अनेक आर्थिक आणि सामाजिक समस्या निर्माण करू शकते. प्लास्टिक कचऱ्याचा पुनर्वापर करणे अत्यंत महत्त्वाचे आहे, ज्यामुळे प्लास्टिक कचरा कमी होतो आणि नैसर्गिक संसाधनांचा वापर कमी होतो.

प्लास्टिकचे विघटन करणारे जिवाणू निर्माण झाले, तरच ते शक्य होईल. २००१ साली जपानमध्ये असे जिवाणू सापडले होते, पण त्यांचा प्लास्टिक खाण्याचा वेग फारच कमी होता. २०१६मध्ये जगाला कळले की, इडिओनेला सकाइनसिस नावाचे जिवाणू चक्क प्लास्टिक खातात. हा जिवाणू ऊर्जास्रोत म्हणून प्लास्टिकमधील कार्बन वापरतो. याचा प्लास्टिक खाण्याचा वेग कमी असल्याने त्याचे म्युटेशन करून तो वाढवण्याचा प्रयत्न चालू आहे. सूक्ष्मजीवांचे हे रहस्य उलगडले, तर शाश्वत भविष्य निर्माण होऊ शकते.

काही देशांत पुनर्निर्माण करता येणारे डबे परत घेतात व त्याबदल्यात पैसे परत करतात. बेल्जियमसारख्या देशात उत्पादन करताना पर्यावरणाला जितका धोका जास्त, तितकी उत्पादकला जास्त किंमत द्यावी लागते. त्यामुळे बेल्जियममधील पीव्हीसी वापरात घट झाली आहे. हा झाला तात्पुरता उपाय. तरी ग्राहकांनी 'तीन आर'च्या सवयी अंगी बाणवल्या तर खूप फरक पडू शकेल.

- Refuse - नाकारणे - कॅरी बॅग, पॉलिथीन (७५ मायक्रोनपेक्षा कमी जाडीच्या), फुग्यांसाठी वापरली जाणारी प्लास्टिक स्टिक, कँडी स्टिक, थमाकोल (पॉलिस्टायरीन), प्लास्टिकच्या प्लेट, कप, ग्लास, चमचे, चाकू, स्ट्रॉ, ट्रे, मिठाईच्या डब्ब्यांना लावण्यात येणारा प्लास्टिकचा कागद, इन्व्हिटेशन कार्ड, सिगरेटचे पाकीट, १०० मायक्रॉनहून कमी प्लास्टिक किंवा पीव्हीसी बॅनर इतर यांना नकार देणे.
- Reduce - कमी करणे - प्लॅस्टिक वापर शक्य तितका कमी करणे
- Reuse - पुनर्वापर करणे - एकल प्लास्टिकचा पुन्हा वापर करता येत नाही. तर झाडे लावण्यासाठी, सजवटीसाठी जाड प्लास्टिक डबे वापरता येतात.

## घोळ संपता संपेना




अकरावी प्रवेशात पारदर्शकता यावी, विद्यार्थ्यांना समान संधी मिळावी म्हणून यंदापासून राज्यभर अकरावीचे प्रवेश ऑनलाइन पद्धतीने करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. पण शालेय शिक्षण विभागाच्या भोंगळ कारभारामुळे या प्रक्रियेचा नाहक त्रास लाखो विद्यार्थी, पालकांना सहन करावा लागत आहे. संकेतस्थळ ठप्प होणे, लॉगइनमधील अडचणी, माहितीपुस्तिकेतील घोळ, प्रकियेबाबत शिक्षकांनाच माहिती नसणे अशा अनेक कारणांनी सुरुवातीलाच प्रवेश प्रक्रिया पुढे ढकलण्याची नामुष्की विभागावर ओढवली. पण हे इथेच थांबलेले नसून रोज नवनवे गोंधळ पुढे येत आहेत. इनहाउस कोट्यासाठी प्रवेश देताना शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय एकाच संकुलात असण्याचा नियम मागे घेत पूर्वीप्रमाणे प्रवेश देण्याचा निर्णय विभागाला घ्यावा लागला. शिक्षक, विद्यार्थ्यांनी आवाज उठवल्यानंतर मार्गदर्शक केंद्रे सुरू करण्याचे शहाणपण अधिकाऱ्यांना सुचले. अल्पसंख्याक कोट्याबाबतही प्रचंड संभ्रम निर्माण झाला आहे. तिसऱ्या यादीनंतर अल्पसंख्याक कोटा प्रत्यार्पित करण्याबाबत न्यायालयाच्या सूचना असताना शिक्षण विभागाने पहिल्या यादीनंतरच कोटा प्रत्यार्पणाचे परिपत्रक काढले! शिवाय नवीन प्रक्रियेत जात पडताळणी, इतर बोर्डांतील विद्यार्थ्यांच्या गुणांबाबतच्या निकषांची पडताळणी याबाबतही त्रुटी असल्यामुळे विद्यार्थ्यांना त्याचा त्रास सहन करावा लागू शकतो. शिक्षण विभाग प्रक्रियेत सपशेल नापास झाल्याचे दिसत असताना त्यातून मार्ग काढण्याऐवजी संबंधित अधिकाऱ्यांकडून शिक्षकांना मिळणारी अतिशय मग्रुरीची उत्तरे दुर्दैवी म्हणावी लागतील. शिक्षणविषयक कोणतीही प्रक्रिया राबवणे हे शाळा, महाविद्यालयांचे काम असते आणि त्यासाठी योग्य सुविधा उपलब्ध करून देणे हे सरकारचे काम असते, पण अकरावी प्रवेशप्रक्रियेबाबत कोणत्याही तज्ज्ञांची मदत घेण्याची काळजी विभागाने घेतली नाही.

## नामुष्कीचा बोगदा

सर्वोच्च न्यायालयाच्या दणक्यानंतर गायमुख बोगदा आणि भाईंदर पुलासाठीच्या 'मेघा इंजिनीअरिंग'ला दिलेल्या अंदाजे १५ हजार ५० कोटी रुपयांच्या कामाची पुनर्निविदा काढण्याची नामुष्की 'एमएमआरडीए'वर आली आहे. खेरीज ही निविदा मूळ अंदाजित प्रकल्प खर्चाच्या तुलनेत तीन हजार कोटी रुपयांनी कमी करणेही भाग पडले आहे. राजकीय नेते आणि बड्या कंपन्यांतील साट्यालोट्यात पायाभूत सुविधांना कसा फटका बसतो आणि करदात्यांच्या पैशांचा कसा चुराडा होतो, याचे हे उदाहरण. निविदा अपात्र ठरवताना कोणतेच कारण दिले नसल्याचा आरोप करीत एल अँड टी या स्पर्धक कंपनीने या प्रकरणी प्रथम मुंबई उच्च न्यायालयात आणि नंतर सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. सर्वोच्च न्यायालयाने याची दखल घेतली. ज्या एल अँड टी कंपनीने केंद्र सरकारचा दिल्लीतील महत्त्वाकांक्षी 'सेंट्रल व्हिस्टा' प्रकल्प राबवला, त्या कंपनीच्या तांत्रिक क्षमतेविषयी शंका घेतल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले. या प्रक्रियेतील त्रुटी व अपारदर्शकतेबद्दल सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नापसंती व्यक्त केल्यानंतरच एमएमआरडीएने निविदाप्रक्रिया रद्द केली. देशाच्या आर्थिक राजधानीजवळच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या निविदाप्रक्रियेत पारदर्शकता नसल्याचा संदेश यानिमित्ताने देशभर गेला. एमएमआरडीएसह सर्वच सरकारी आस्थापनांनी संपूर्ण पारदर्शकता बाळगून आणि सर्व स्पर्धक कंपन्यांना समान संधी देऊन सार्वजनिक प्रकल्पांसाठी योग्य त्याच कंपनीची निवड करणे अपेक्षित आहे. पण गायमुख प्रकरणात तसे झाले नाही. सत्तेतील चेहरे बदलले तरी कंपन्याची नावे तीच तीच असतात. ठाण्यातील घोडबंदर रोडवरील रोजच्या वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटलेला नाही. त्यात आता संबंधित प्रकल्पासाठी पुनर्निविदा, विविध परवानग्या यामुळे प्रकिया लांबणार आहे. शिवाय मेट्रो १०च्या कामावरही त्याचा विपरीत परिणाम होईल. एकूणात एमएमआरडीच्या या गोंधळाचा फटका सर्वसामान्यांनाच सहन करावा लागेल. शिवाय करदात्यांच्या पैशांचा चुराडा होणार तो वेगळाच.

# थेट विदेशी गुंतवणुकीचा विसंगत खेळ

महाराष्ट्रात १ लाख ६४ हजार कोटींहून अधिक गुंतवणूक झाली, देशातील ४० टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात आली, असे आकडे सादर करत फडणवीस, शिंदे, अजित पवार यांच्या महायुती सरकारच्या कार्यकाळात गुंतवणूकदारांचा प्रचंड विश्वास निर्माण झाल्याचा दावा केला गेला. परंतु हे आकडे खरे असले तरी त्यांची मांडणी फसव्या ढंगाने केली गेली आहे. त्याचा वास्तवाशी, राज्याच्या विकासाशी, राज्यातील जनतेच्या सामाजिक आर्थिक प्रगतीशी समन्वय आणि संबंध नाही.



महायुती सरकारने २०२४-२५ या आर्थिक वर्षात महाराष्ट्रात आलेल्या विदेशी गुंतवणुकीचा मोठा गाजावाजा केला आहे. महाराष्ट्रात १ लाख ६४ हजार कोटींहून अधिक गुंतवणूक झाली, देशातील ४० टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात आली, असे आकडे सादर करत फडणवीस, शिंदे, अजित पवार यांच्या महायुती सरकारच्या कार्यकाळात गुंतवणूकदारांचा प्रचंड विश्वास निर्माण झाल्याचा दावा केला गेला. परंतु हे आकडे खरे असले तरी त्यांची मांडणी फसव्या ढंगाने केली गेली आहे. त्याचा वास्तवाशी, राज्याच्या विकासाशी, राज्यातील जनतेच्या सामाजिक आर्थिक प्रगतीशी समन्वय आणि संबंध नाही.

थेट विदेशी गुंतवणूक हा एकाच सरकारच्या कामगिरीचा परिणाम नसतो. तो अनेक वर्षांच्या धोरणांचा, बाजाराच्या परिस्थितीचा आणि जागतिक आर्थिक चढ-उतारांचा परिणाम असतो. २०२४-२५ मध्ये झालेली गुंतवणूक ही मुख्यतः जागतिक बाजारपेठेतील संधींमुळे आणि मुंबईच्या जागतिक आर्थिक राजधानी म्हणून असलेल्या स्थानामुळे आली आहे. महाराष्ट्राने अशा गुंतवणुकीचा फायदा घेतला आहे, हे मान्य. पण हे फक्त एकट्या माणसांमुळे झाले असे म्हणणे म्हणजे इतिहासाची आणि वास्तवाची घोर फसवणूक ठरते.

**गुंतवणुकीचे आकडे, रोजगार कुठे?**

महाराष्ट्रात विदेशी गुंतवणूक वाढल्याचा दावा करताना एक गोष्ट सातत्याने दुर्लक्षित ठेवली जाते, ती म्हणजे अशा गुंतवणुकीतून निर्माण होणारा रोजगार. गेल्या काही वर्षांत रोजगाराची आकडेवारीच सादर केली जात नाही. या गुंतवणुकीमुळे राज्यातील किती तरुणांना, ग्रामीण भागातील मजुरांना आणि लघु उद्योगांना फायदा झाला, हे आकडे महायुती सरकार सांगत नाही. मोठ्या संख्येने गुंतवणूक आली, पण ती पुणे, मुंबई, नवी मुंबई, नाशिक यांसारख्या मर्यादित महानगरांपुरतीच का? विदर्भ, मराठवाडा, कोकणासाठी फक्त आश्वासनांचे जुमलेच राहिले आहेत.

**'विकास' म्हणजे खरोखर काय?**

फडणवीस सरकारच्या काळात 'विकास' म्हणून समृद्धी महामार्ग, उद्घाटनाच्या १७ दिवसांत जलमय झालेली मेट्रो, अद्याप कामही सुरू न झालेला नदीजोड प्रकल्प, सौरऊर्जा, आंतरराष्ट्रीय विमानतळ, वाढवण बंदर यांचा उल्लेख केला जातो. या प्रकल्पांचा खरा खर्च, त्यात झालेला विलंब, भ्रष्टाचाराचे आरोप आणि स्थानिक जनतेचे विस्थापन या बाबींवर सरकार बोलत नाही. आता राज्याच्या बहुतांश भागांमध्ये पवनचक्क्यांचे प्रकल्प आले आहेत. त्यात शेतजमिनी जात आहेत. गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. या प्रकल्पांमुळे होणारा पर्यावरणाचा विनाश, जमिनींचे अधिग्रहण, शेतकऱ्यांचा असंतोष आणि असंतुलित विकासाचे दुष्टचक्र निर्माण झाले. विकास म्हणजे केवळ सिमेंटचे रस्ते आणि गगनचुंबी इमारती नव्हे, तर स्थानिक गरजांना उत्तर देणारी, समतोल सामाजिक-आर्थिक वाढ होय.

गेल्या दोन आठवड्यांत राज्यात झालेल्या अवकाळी पावसाने राज्यातील शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे. बाजार समितीत विकायला आणलेल्या भुईमुगाच्या शेंगा पावसाच्या पाण्यात वाहून जाऊ नयेत म्हणून स्वतः पाण्यात आडवा झोपून त्या वाचवण्याचा प्रयत्न करणारा वाशिम जिल्ह्यातला हतबल तरुण शेतकरी आपण पाहिला आहे. शेतात काढून ठेवलेले कांदे पावसात वाहून गेल्यामुळे आपल्याला आपले वडील शाळेत जाण्यासाठी चप्पल घेऊ शकत नाहीत हे बीडच्या चिमुकलीचे वाक्य ऐकून अनेकांचे हृदय पिळवटून गेले. ही शेतकऱ्यांच्या दुरावस्थेची काही प्रातिनिधिक उदाहरणे आहेत. राज्यातल्या बहुतांश भागांत हेच चित्र आहे. मात्र सरकारला या गरीबांचे अश्रू पुसण्यापेक्षा परकीय गुंतवणुकीचे आकडे सांगून स्वतःची पाट थोपटून घेण्यात जास्त रस आहे.

महाविकास आघाडीला दूषणे देऊन युती सरकारला जबाबदारी झटकता येणार नाही.

२०१९-२२ या काळात महाविकास आघाडी सरकारने गुंतवणूक रोखली, प्रकल्प बाहेर गेले असा आरोप केला जातो. पण वस्तुस्थिती याहून पूर्णतः वेगळी आहे. कोविड काळात संपूर्ण जग ठप्प होतं, आर्थिक अनिश्चितता होती. अशा परिस्थितीत गुंतवणूक कमी झाली. देशातल्या सर्वच राज्यात ही परिस्थिती होती. वेदांता फॉक्सकॉन प्रकल्प गुजरातला गेला, त्याचं खापर महाविकास आघाडीवर फोडण्यात आले, पण प्रत्यक्षात गुजरातने पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्तक्षेपामुळे तो प्रकल्प खेचून घेतला, हे स्पष्ट आहे. महाराष्ट्रातील उद्योगधंद्याची वाढ ५.६ टक्क्यांवरून ४.९ टक्क्यांवर घसरली आहे. सेवा क्षेत्र ही घसरले आहे. त्यामुळे रोजगार कमी झाले आहेत.

परकीय गुंतवणूक वित्तीय क्षेत्रात आली आहे, औद्योगिक क्षेत्रात नाही ही अत्यंत काळजी वाढवणारी बाब आहे. शेतकऱ्यांच्या मेहनतीमुळे कृषीक्षेत्राचा विकास दर वाढला, पण सरकारने शेतकऱ्यांच्या मालाला भाव दिला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले. आर्थिक सर्वेक्षण अहवालानुसार फक्त मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक, नागपूर, कोल्हापूर या जिल्ह्यांची परिस्थिती चांगली आहे. बाकी जिल्ह्यांची अवस्था दयनीय आहे.

**फक्त आकड्यांचा खेळ**

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, सामाजिक रचना आणि औद्योगिक क्षमता ही एका सरकारच्या कार्यकाळाच्या पलीकडे आहे. महायुतीने 'विकास' हाच एकमेव अजेंडा आहे असे सांगितले. पण सत्तेचा वापर केवळ प्रचारासाठी आणि विरोधकांवर चिखलफेक करण्यासाठी होत आहे. महागाई, शिक्षण व आरोग्य क्षेत्रातील उपेक्षा, ओला दुष्काळ, शेतकरी आत्महत्या यावर मौन बाळगणाऱ्या सरकारने 'गुंतवणुकीचा डंका' वाजवणं म्हणजे गरीबांच्या पोटावर लाथ मारून श्रीमंतांच्या छत्र्यांखाली नाचण्यासारखं आहे.

खरी गरज आहे ती समावेशक विकासाची. केवळ मुंबई-पुणे नव्हे, तर धुळे, नंदुरबार, यवतमाळ, बुलढाणा, गडचिरोली, सिंधुदुर्ग, भंडारा, गोंदिया, धाराशिव, हिंगोली, बीड या भागांचा आर्थिक सहभाग वाढवण्याची. फडणवीस सरकार जर खरोखर प्रगतीसाठी प्रयत्नशील असेल, तर विरोधकांवर टीका करण्यापेक्षा त्यांनी सर्वपक्षीय सहकार्याने राज्याच्या विकासासाठी काम करावे. 'विकास' म्हणजे प्रचार नव्हे, ती जनतेच्या जीवनमानात खऱ्या अर्थाने सुधारणा होण्याची प्रक्रिया असते आणि ती फसव्या आकड्यांनी नाही, तर कृतीने सिद्ध करावी लागते.



# भविष्याचा आरसा-अंटार्क्टिका

अंटार्क्टिकातील हिमनग वितळत असल्याची वृत्ते येत असली तरी अलीकडेच उपग्रहांच्या साह्याने संकलित केलेल्या विदेवरून, सन २०२१ ते २०२३ या कालावधीत अनपेक्षितरित्या येथील हिमाचे प्रमाण वाढत आहे, हे लक्षात आले. हे अनुमान चीनमधील तांगजी विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी नासाच्या 'ग्रेस' आणि 'ग्रेस एफओ' या दोन मोहिमांवरून मिळवलेल्या विदेवर आधारित आहे. यांच्या मते या कालावधीत बर्फाची वाढ दर वर्षी सुमारे १०८ अब्ज टन आहे. पूर्व अंटार्क्टिकाच्या टोटेन, डेन्मान, मॉस्को युनिव्हर्सिटी आणि व्हीन्सेस बे या चार मुख्य हिमनगांवर हिमवृष्टी वाढली, हे त्याचे कारण आहे.

मात्र तज्ज्ञांच्या मते, हा बदल तात्पुरता असावा आणि हवामान बदलाच्या विक्षिप्त परिणामांमुळे असे झाले असावे. सन २०२१ ते २०२३दरम्यान हिमामध्ये झालेली वाढ हा असाधारण ऋतूबदल व जागतिक तापमानवाढीमुळे बदललेले वातावरण आणि महासागरातील अभिसरण यांचा तात्पुरता परिणाम होता. हिमनगांचे अभ्यासक शास्त्रज्ञ एरिक रिंगनोट यांच्या मते, अंटार्क्टिकात नवीन निर्माण झालेले हिमनग हे कोणत्याही क्षणी कोसळतील आणि मोठे हानिकारक बदल होतील. हे महत्त्वाचे हिमनग पूर्णपणे कोसळले, तर महासागराची जलपातळी सात मीटर किंवा २३ फूट वाढेल. त्यामुळे विशेषतः बांगलादेश, आग्नेय आशियातील बेटांवर वसलेली राष्ट्रे आणि न्यूयॉर्क, मुंबई आणि लागोस यांसारखी किनारपट्टीवरील शहरे बुडण्याची भीती आहे.

यामुळे अब्जावधी डॉलरचे नुकसान होईल, बंदरे, रस्ते अशा पायाभूत सुविधांची हानी होईल. पूर, वाढीव तापमानामुळे रोगराई, पाण्याची आणीबाणी, अन्नसुरक्षा हे प्रश्न निर्माण होतील. समुद्राचे खारे पाणी शिरल्यामुळे बरीच शेतजमीन नापीक होण्याचाही धोका आहे. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण होईल. म्हणूनच हवामान बदल हा केवळ पर्यावरणीय धोका राहिलेला नसून भूराजकीय स्वरूपातील संकट ठरेल.

अंटार्क्टिकावर अकस्मात झालेली हिमातील वाढ क्षणिक बेसावध करू शकते. परंतु हवामान बदल हेच घातक वास्तव असल्यामुळे माणसे, शहरे आणि परिसंस्था या साऱ्यांचीच काळजी घेणे आवश्यक आहे.

# बो-टाय पास्ता सॅलड

**साहित्य :** १ वाटी बो-टाय पास्ता (टायचा बो अर्थात गाठीप्रमाणे आकार असलेला पास्ता), १०० ग्रॅम बोनलेस चिकन, ३ ब्रेड स्लाइस, ४-५ लसूण पाकळ्या, ५० ग्रॅम ऑलिव्ह तेल, १०० ग्रॅम प्रोसेस्ड चीझ, २ अंड्यांचे पिवळे बलक, मीठ चवीनुसार, ८-१० लेट्युसची पाने, हवे असल्यास चिली फ्लेक्स.




**कृती :** सगळ्यात आधी पास्ता मिठाच्या उकळत्या पाण्यातून उकडून घ्या. बो-टाय पास्ता मिळाला नाही किंवा आवडत नसेल तर मॅक्रोनी किंवा तुमच्या आवडीचा पास्ता घेता येईल. पास्ता उकडल्यावर लगेचच पाण्याखाली गार करा आणि थोडं तेल लावून फ्रीजमध्ये ठेवा. लसणीचे बारीक बारीक तुकडे करून घ्या. चिकनला मीठ, मिरपूड लावून पॅनमध्ये थोड्याशा ऑलिव्ह तेलात शिजवून घ्या. ब्रेड स्लाइसचे छोटे छोटे चौकोनी तुकडे करून ते पॅनमध्ये भाजून घ्या. यात थोडंसं तेल आणि लसूण घालून त्याला छान लसणीचा स्वाद येऊ द्या. चीझ किसून ठेवा. अंड्याचे पिवळे बलक चांगले लुसलुशीत होईपर्यंत फेटून घ्या. त्यात चीझ घाला आणि थोडंसं ऑलिव्ह तेल घाला. मिश्रण फेटून घ्या. एका बाऊलमध्ये लेट्युसची पाने, पास्ता, चिकन आणि ब्रेडचे तुकडे एकत्र टॉस करा. त्यावर बनवलेले चीझ आणि अंड्याचे ड्रेसिंग वाढा. आता हे सॅलड थंड करून पेश करा.

# फेस स्क्रब डोळ्यांच्या पापण्यांवर वापरणे योग्य आहे का?

**जर तुम्ही वारंवार मेकअप करीत असाल तर शक्य असेल तेव्हा मेकअप करणे टाळा. प्रत्येकवेळी मेकअप केल्यावर तो एखाद्या चांगल्या क्लिनझरने काढून टाका. ब्युटी एक्स्पर्ट आश्मीन मुंजल यांच्याकडून जाणून घेऊयात डोळ्यांच्या पापण्यांची निगा कशी राखावी.**

**संपूर्ण** चेहऱ्यात डोळे हा फार नाजूक अवयव आहे. त्यात डोळ्यांच्या पापण्या हा तर अति संवेदनशील भाग आहे. त्यामुळे निरोगी राहण्यासाठी व सौंदर्य टिकवण्यासाठी त्यांची डोळ्यांची योग्य निगा राखणे फार गरजेचे आहे. जर तुम्ही वारंवार मेकअप करीत असाल तर शक्य असेल तेव्हा मेकअप करणे टाळा. प्रत्येक वेळी मेकअप केल्यावर तो एखाद्या चांगल्या क्लिनझरने काढून टाका. ब्युटी एक्स्पर्ट आश्मीन मुंजल यांच्याकडून जाणून घेऊयात डोळ्यांच्या पापण्यांची निगा कशी राखावी.



सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे डोळ्यांच्या पापण्यांवर कधीही स्क्रब वापरू नका. कारण तुमच्या पापण्यांवरील अतिसंवेदनशील त्वचा व पापण्यांवरील केस यावर अति सौंदर्यप्रसाधनांचा वापर केल्यामुळे त्यांचे नुकसान होऊ शकते. खरं तर पापण्यांना फार स्वच्छतेची गरज नसते व पापण्यांवर फेस स्क्रब तर मुळीच वापरू नयेत.

तसेच चेहऱ्यासाठी वापरण्यात येणारे फेस स्क्रब डोळ्यांच्या पापण्यांसाठी योग्य नसतात. कारण ते पापण्यांच्या त्वचेसाठी त्रासदायक ठरू शकतात. मात्र जर तुमच्या भुवयांच्या केसांमध्ये कोंडा असणे किंवा तुम्हाला पापण्यांजवळील त्वचा कोरडी असण्याची समस्या असेल तर तुम्ही अगदी सौम्य स्क्रब वापरू शकता. यासाठी अति दाणेदार अथवा खरखरीत नसलेले एखादे सौम्य ॲप्रिकॉट स्क्रब तुम्ही घेऊ शकता. या स्क्रबचा काही भाग घ्या व त्यामध्ये थोडे मॉश्चरायझर मिसळून तुम्ही त्याचा हलक्या हाताने तुमच्या पापण्यांवर मसाज करू शकता. हा मसाज करताना एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवा हा मसाज क्लॉकवाइज करावा.



जर तुमच्या पापण्यांवरील केस पातळ व कमजोर असतील तर मात्र तुमच्या डोळ्यांच्या आजूबाजूला कोणतेही सौंदर्यप्रसाधने वापरू नका. जर तुमच्या पापण्यांवरील केस दाट असतील व तुम्हाला कोरड्या त्वचेची समस्या असेल तर तुम्ही वर दिलेले मिश्रण वापरू शकता. डोळ्यांच्या पापण्यांवर कोरफडाचे जेल अथवा मास्क वापरणे योग्य ठरेल.

# सकाळची न्याहारी किती आवश्यक आहे!

**सकाळची** न्याहारी शरीरासाठी किती आवश्यक आहे, हे सर्वजण जाणत असूनही अनेक लोक सकाळच्या नाश्त्याकडे दुर्लक्ष करून घराबाहेर पडतात. त्याचे दुष्परिणाम मग त्यांच्या शरीरावर होतात.

सकाळचा नाश्ता निरोगी राहण्यासाठी फार महत्त्वाचा आहे. नाश्ता शरीरात ऊर्जा निर्माण करतो. नाश्ता करणारे लोक नाश्ता न करणाऱ्या लोकांपेक्षा अधिक धडधाकट असतात. सकाळी उठल्यानंतर एक तासात नाश्ता करायला हवा. नाश्ता केल्याने मेंदूला चालना मिळते व एकाग्रता वाढायलाही मदत होते. शाळा-कॉलेजांत जाणारी बरीचशी मुले जी नाश्ता करत नाही, त्यांचे लक्ष अभ्यासात केंद्रित होत नाही. पण समतोल नाश्ता घेतला तर अनेक आजारांपासून आपला बचाव होऊ शकतो.



सकाळच्या नाश्त्यात प्रथिने, खनिज, व्हिटॅमिन, फायबर, कार्बोहायड्रेट इत्यादी घटकांचा समावेश करा. नाश्त्यामध्ये भाज्या, फळं, दूध, मोड आलेले कडधान्य, पनीर, दही, सालीच्या डाळी इत्यादींचा समावेश करा. तसेच संमिश्र भाज्या मिळवलेले पोहे, ओट्स, उपमा, दालिया, चिलाल चपाती, इडली, उकडलेले अंडे इत्यादी घेऊ शकता.

सकाळचा नाश्ता केल्यास हृदयरोग, अल्सर, मधुमेह, लठ्ठपणा यासारख्या आजारापासून बचाव होऊ शकतो.

# आपल्याला होते फूड ॲलर्जी, तर हे करा

**जेव्हाही** आपले शरीर खाण्याप्रती अधिक क्रियाशील होते तेव्हा फूड ॲलर्जीची तक्रार होऊ शकते. अशात काही प्रोटीनयुक्त आहारदेखील आपल्या शरीराला नुकसान करू शकतात कारण काही लोकांची प्रतिकारशक्ती काही पदार्थांना प्रतिसाद देऊ शकत नाही आणि त्याचे दुष्परिणाम म्हणून ॲलर्जी दिसून येते. मुख्यतः लोकांना मैदा, सोया, अंडी, मासे, शेंगदाणे, काही विशिष्ट मसाले किंवा एखाद्या तेलाच्या प्रकारची ॲलर्जी असते. कधी कधी ॲलर्जी टेस्ट मध्येही ॲलर्जी नेमकी कसली आहे हे कळून येत नाही. अशात ते आपल्यालाच शोधून काढायला हवे. एकदा ॲलर्जी कोणत्या पदार्थाची आहे समजल्यावर पथ्ये पाळणे आवश्यक असतं.

**सामान्यतः ॲलर्जीची ही लक्षणे असतात** ▮खाज सुटणे ▮अतिसार ▮डोळे, ओठ आणि चेहऱ्यावर सूज येणे ▮श्वास घ्यायला त्रास होणे ▮हृदयाच्या ठोक्यांची गती वाढणे

**यापासून वाचण्यासाठी**

▮जर आपल्या खाण्यामुळे त्रास होत असेल तर खाण्याशी संबंधित सर्व धान्य टाळावे. ▮बाहेर आहार घेताना विशेष काळजी घ्यावी.

# लंचनंतर अजिबात नका करू हे काम

**ब्रश करणे :** लंचनंतर ब्रश करणे योग्य नाही. कारण आपण सिट्रस असलेला आहार घेतला असल्यास ब्रश केल्याने दातांवरील ती परत निघून जाते ज्याला इनेमल असे म्हणतात.



**अधिक पाणी पिणे :** आपण जेवल्यानंतर अधिक मात्रेत पाणी पित असल्यास पाचक प्रणालीवर याचा गंभीर प्रभाव होतो. यामुळे अनेक रोग उद्भवण्याची शक्यता असते. खरं म्हणजे जेवताना आणि जेवण झाल्यावर लगेच पाणी पिणे विष समजले जाते. जेवण झाल्यावर कमीत कमी अर्धा किंवा तासाभरानंतर पाणी पिणे योग्य आहे.

**फिरणे :** काय आपण ही लंच घेतल्यानंतर फेऱ्या मारता? पण ही एक हानीकारक सवय आहे जी लगेच थांबवायला हवी. तज्ज्ञांप्रमाणे आमची पाचक प्रणाली इतकी मजबूत आहे की लंचमध्ये आपण कितीही अटरम- शटरम खाल्लं असेल तरी सर्वकाही पचून जातं. या दरम्यान आमची प्रणाली आहाराला पचवून सर्व आवश्यक पोषण आम्हाला ऊर्जेच्या रूपात देतं. पण आमचे हे सिस्टम जरा संवेदनशील असल्यामुळे तेव्हा त्याला आपले कार्य सुरळीतरीत्या पार पडण्यात अडथळा निर्माण होतो जेव्हा आपण त्याला यातना देतात. म्हणून दुपारी लंच केल्यानंतर फिरणे किंवा काही हेवी कार्य करण्याऐवजी १५ ते २० मिनिटे आराम करण्याचा सल्ला दिला जातो.

**ड्रायव्हिंग :** जेवण पचवण्यासाठी अधिक रक्ताची गरज असते, ज्यासाठी मेंदू मदत करतं. परंतु जेवल्यानंतर आपण ड्रायव्हिंग करत असाल तर मेंदू त्यावर आपलं लक्ष केंद्रित करतो आणि जेवण पचवण्यात त्याची मदत मिळत नाही.

**झोपणे :** लंचनंतर लगेच झोपल्याने पचन संबंधी रोग होऊ शकतात. याने आपल्या गॅससंबंधी समस्याही उद्भवू शकते.

# फोनचे ब्लूटूथ नेहमी ऑन असते?
## मिनिटात होऊ शकते डिव्हाइस हॅक, असे राहा सेफ

जर तुम्ही तुमच्या फोनमध्ये नेहमी ब्लूटूथ चालू ठेवत असाल तर, सावध व्हा. कारण, यामुळे तुमचा फोन हॅक देखील होऊ शकतो. जाणून घेऊया याबद्दल सविस्तर. ब्लूटूथ सर्व फोनमध्ये असते आणि बरेच लोक ते सतत वापरतात सुद्धा. स्मार्टफोन, टॅबलेट आणि लॅपटॉपमध्ये ब्लूटूथ आधीच दिलेले आहे. एका डिव्हाइसवरून दुसऱ्या डिव्हाइसमध्ये फाइल ट्रान्सफर करण्यासाठी ब्लूटूथची आवश्यकता असते. पण तुम्हाला माहीत आहे का ? डिव्हाइसमध्ये असलेले ब्लूटूथ जितके सोयीस्कर आहे तितकेच ते धोकादायकसुद्धा असू शकते. हॅकर्स ब्लूटूथद्वारे तुमचे डिव्हाइस हॅक करू शकतात. त्याला ब्लूबगिंग असेही म्हणतात. ब्लूटूथ हॅकिंग कसे केले जाते आणि त्यापासून तुम्ही कसे सुरक्षित राहू शकता, याबद्दल ही महत्त्वाची माहिती.

**ब्लूटूथ हॅकिंग कसे काम करते?**

हॅकर्स एक विशिष्ट सॉफ्टवेअर वापरतात, जे आपोआप ब्लूटूथने सुसज्ज असलेली उपकरणे शोधतात. हॅकर्स हेदेखील पाहू शकतात की, तुमचे डिव्हाइस आधी कोणत्या नेटवर्कशी कनेक्ट केले गेले आहे. फोन आधीपासून कनेक्ट केलेले नेटवर्क पुरेसे विश्वासार्ह मानतो आणि भविष्यात त्यांच्याशी आपोआप कनेक्ट होतो. सायबर गुन्हेगारांना तुमच्या डिव्हाइसचे विश्वसनीय नेटवर्क माहीत असल्यास, ते त्याद्वारे तुमच्या डिव्हाइसशी कनेक्ट होतात. यानंतर तुमचे डिव्हाइस हॅक होते. त्यानंतर हॅकर्स डिव्हाइसमध्ये मालवेअर इन्स्टॉल करतात. याद्वारे हॅकर्स तुमची हेरगिरी करतात. तुमचे मेसेजेस वाचतात आणि डेटा देखील चोरू शकतात.



**यापासून सुरक्षित कसे राहायचे?**

डिव्हाइस वापरात नसताना ब्लूटूथ डिसेबल करा. तुम्हाला फाइल्स ट्रान्सफर करायच्या असतील तर, तुम्ही एयर ड्रॉप किंवा फास्ट शेयर वापरू शकता. ब्लूटूथ सेवांची प्रवेशक्षमता मर्यादित करा. हे ब्लूबगिंग टाळते. तुमच्या स्मार्टफोन, टॅबलेट आणि ब्लूटूथ सक्षम संगणकांवर तुमच्याकडे अँटीमालवेअर ॲप स्थापित असल्याची खात्री करा. एखाद्या हॅकरने तुमच्या डिव्हाइसमध्ये शिरण्याचा प्रयत्न केल्यास, अँटी-मालवेअर ॲप तुमची गोपनीयता आणि वैयक्तिक डेटा संरक्षित करताना संशयास्पद ॲक्टीव्हीटीज शोधू आणि ब्लॉक करू शकतो.

# वजन घटवण्यासाठी 'पीनट बटर' उपयुक्त

**सँडविचमध्ये** लावण्यासाठी एक अतिशय पौष्टिक 'स्प्रेड' म्हणून 'पीनट बटर' म्हणजेच शेंगदाण्यांपासून तयार केले गेलेले बटर अतिशय लोकप्रिय होऊ लागले आहे. अतिशय पौष्टिक तत्त्वांनी परिपूर्ण असे पीनट बटर वजन घटवण्यासाठीही उपयुक्त असल्याचे आहारतज्ज्ञ म्हणतात. पीनट बटरमध्ये असणारी प्रथिने, जीवनसत्त्वे आणि क्षार वजन घटवण्यास सहाय्यक आहेत. पीनट बटरच्या सेवनाने भूक लवकर शमत असून, त्यामुळे अन्नाचे सेवन आपोआपच कमी होते. याच्या सेवनाने शरीराची चयापचय शक्ती वाढत असून, त्यामुळेही वजन घटण्यास मदत होते. पीनट बटर पोळीबरोबर, भाकरीबरोबर किंवा गव्हापासून तयार केलेल्या ब्रेडसोबत खाता येऊ शकते. फळे किंवा कच्च्या भाज्यांच्या कापांच्या सोबतही हे बटर खाता येते. सकाळच्या नाश्त्यामध्ये ओटमिल घेत असल्यास किंवा दह्यामध्ये मिसळूनही पीनट बटरचे सेवन करता येते. मात्र वजन घटवताना पीनट बटर आहारामध्ये समाविष्ट करताना त्यामध्ये इतर 'ॲडीटिव्ह' असणार नाहीत याची काळजी घेणे आवश्यक आहे. पीनट बटर बाजारातून आणण्यापेक्षा घरी तयार करणे अधिक चांगले. हे बटर बनवण्यासाठी शेंगदाणे भाजून घ्यावेत आणि त्यांची साले काढून घ्यावीत. त्यानंतर शेंगदाणे मिक्सरमध्ये घालून थोडेसे शेंगदाण्याचे तेल घालावे, त्यानंतर मिक्सर सुरू करून शेंगदाणे तीन ते चार मिनिटे मिक्सरवर वाटावेत. तयार झालेल्या शेंगदाण्याच्या पेस्टला पीनट बटर म्हटले जाते. यामध्ये चवीला थोडेसे मीठ घालावे. तसेच आवडत असल्यास किंचित मध आणि दालचिनीची पूडही यामध्ये घालता येऊ शकते.



# चेहरा उजळण्यासाठी कांदा आणि लसणाचा फेसपॅक

**सुंदर, नितळ, गोरी त्वचा कोणाला नको असते. यासाठी लोक चेहऱ्यावर विविध प्रयोग करत असतात. मात्र कांदा आणि लसूणचा फेसपॅक तुम्ही कधी ट्राय केलाय का?**





**त्वचा उजळण्यासाठी लसूण फायदेशीर :** लसूणमध्ये व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन बी६, सेलेनियम, झिंक असते. त्वचेवरील मुरुमे हटवण्यासाठी लसूण फायदेशीर आहे. लसणाच्या पेस्टमध्ये मध मिसळून हा पॅक लावल्यास चेहऱ्यास फायदा होता. पिंपल्सच्या जागी लसूणचा रस लावा, पिंपल्स लवकर बरे होतील आणि डाग राहणार नाहीत.

**त्वचेसाठी वरदान आहे कांदा :** कांद्यामध्ये अनेक व्हिटॅमिन असतात. याशिवाय अँटीऑक्सिडंट्सही असतात. कांद्याच्या रसात अँटी सेप्टिक, अँटी-बॅक्टेरियल यासारखे गुण असतात. ज्यामुळे त्वचेवरील मुरुमे निघून जातात.

**कसा करावा वापर :** तुम्ही रोजच्या डाएटमध्ये कच्च्या कांद्याचा वापर करू शकता. कांदा त्वचेसाठी चांगला. याशिवाय तुम्ही कांदा किसून त्याचा फेसपॅक बनवून वापरू शकता. तसेच कांद्याच्या रसाचाही वापर करू शकता.

# घरगुती लिपस्टिक तयार करणे इतके सोपे

**बाजारात** मिळणारे कॉस्मेटिक महाग तर असतातच पण आपल्या स्कीनवर विपरित परिणाम करणारे असतात. त्यातून ओठ हे तर सर्वात नाजूक असतात, यावर रोज बाजारातील लिपस्टिक लावली तर ओठ काळे पडू लागतात. म्हणून येथे आम्ही सोपी पद्धत सांगत आहोत ज्याने आपण घरी लिपस्टिक तयार करू शकता.



**साहित्य :** एक बीट, १/२ कोकोनट ऑइल, १/२ चमचा मधमाश्यांचे मेण, १/२ चमचा कोको बटर

**कृती :** बिटाचे पातळ काप करून वाळू द्या. डिहायड्रेटरमध्ये हे काप १२० डिग्रीवर ८ तास ठेवून वाळवू शकता. नंतर मिक्सरमधून वाटून पावडर तयार करा. मंद आचेवर एका भांड्यात अर्धा ते १ कप पाणी टाकून त्यात मेण, कोकोबटर, कोकोनट ऑइल आणि बीट पावडर मिसळा. चांगले ढवळा. गडद रंगासाठी अधिक पावडर किंवा वाळलेल्या चेरीज वापरू शकता. घट्ट झाल्यावर मऊ कपड्याने गाळून घ्या. लिप कंटेनरमध्ये हे मिश्रण ओतून घ्या. थंड होऊ द्या. आपले लिपस्टिक तयार झाले. हे पूर्णपणे नैसर्गिक असल्यामुळे ओठ काळे पडणार नाहीत.

# 'ब्लॅक टी'चे असेही फायदे

**ब्लॅक** टीमुळे शरीरातील टॉक्सिंस, विषारी घटक बाहेर निघण्यास मदत होते. भारतात सर्वाधिक प्यायले जाणारे पेय म्हणून चहाचा पहिला क्रमांक लागतो. चहा, कॉफी म्हटले की अनेक जण दुधाचा चहा, कॉफीला पसंती देतात. दुधाच्या चहाच्या तुलनेत खूप कमी लोकांना ब्लॅक टी आवडते. तुलनेने ब्लॅक टी चवीला चांगली लागत नसली तरी तिचे अनेक फायदे आहेत. बाजारात अनेक प्रकारच्या ब्लॅक टी उपलब्ध आहेत. घरात बनवली जाणरी ब्लॅक टी लिंबू रस टाकून घेता येते. बाजारात इंग्लिश ब्रेकफास्ट टी, अर्ल ग्रे टी, आसाम टी, दार्जिलिंग टी, निलगिरी टी असे चहाचे अनेक प्रकार उपलब्ध आहेत.



काही दिवसांपूर्वी अमेरिकेतील कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीत एक संशोधन करण्यात आले होते. या संशोधनाचा अहवाल युरोपियन जर्नल ऑफ न्यूट्रिशनमध्ये पब्लिश करण्यात आला होता. या अभ्यासानुसार ब्लॅक टीमध्ये विविध प्रकारचे विशेष तत्त्व असल्याचे सिद्ध झाले आहे. ब्लॅक टीमधील चहाचे विशेष तत्त्व पोटात जाऊन मोठा प्रभाव पाडतात. ब्लॅक टीमुळे वजन घटवण्यास मदत होते. तसंच शरीरातील टॉक्सिंस, विषारी घटक बाहेर निघण्यास मदत होते. विषारी द्रव्ये शरीरातून बाहेर निघाल्यामुळे कोणताही आजार बळावण्याची शक्यता कमी होते. टॉक्सिंस शरीरातून बाहेर पडल्यामुळे आरोग्यही उत्तम राहण्यास मदत होते.

चहात ॲण्टी ऑक्सिडेंट सर्वाधिक असतात. अनेक संशोधनांतून संशोधकांनी ब्लॅक टी आणि ग्रीन टीमध्ये प्रोबायोटिक्स तत्त्व आढळून येत असल्याचे सांगितले आहे. प्रोबायोटिक्स तत्त्व शरीरात प्रतिरोधक सूक्ष्मजीवांच्या वाढीसाठी मदत करतात. ब्लॅक टी वजन नियंत्रणात ठेवून अनेक आजारांपासून बचावही करते.



ब्लॅक टीमध्ये दूध आणि साखर नसल्याने शरीरात फॅट जमा होत नाही. चहातील ॲण्टीऑक्सिडेंट शरीरातील अतिरिक्त चरबी न वाढू देण्याचे काम करते. एका संशोधनातून दिवसांतून तीन वेळा ब्लॅक टी पिण्यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहत असल्याचे समोर आले आहे. डोकेदुखी होत असल्यास ब्लॅक टीमध्ये लिंबू टाकून प्यायल्याने डोकेदुखीत आराम मिळतो.

# इंटरनेटवरील नको त्या गोष्टींपासून मुलांना असे ठेवा दूर

**आजच्या** डिजिटल जगात, इंटरनेटचा वापर थोरा-मोठ्यापासून ते लहान मुलापर्यंत प्रत्येक व्यक्ती करतो. लहान मुलांना इंटरनेटवर सहसा ऑनलाइन व्हिडीओ किंवा त्यांच्या वयोगटाशी संबंधित कार्टून इत्यादी यूट्यूबवर पाहायला आवडते. मात्र इंटरनेटवर अनेक प्रकारचे कंटेंट उपलब्ध असतात. ज्यामुळे मुले भरकटू शकतात. असे होऊ नये याकरिता मुलांच्या इंटरनेट ॲक्टिव्हिटीवर लक्ष ठेवणे आणि त्यासाठी सुरक्षित पद्धतींचा अवलंब करणे अत्यंत आवश्यक आहे. तुम्हालाही तुमच्या मुलांचा इंटरनेट वापर सुरक्षित ठेवायचा असेल तर, ही माहिती तुमच्यासाठी. यामध्ये आज आम्ही चुकीच्या कंटेंटपासून मुलांचे संरक्षण करण्याच्या काही सोप्या टिप्स सांगणार आहोत. जाणून घेऊया.



**पॅरेंट्स कंट्रोल्स वापरा :**

आजकाल गुगलसह यूट्यूब आणि इंस्टाग्रामसारख्या अनेक प्लॅटफॉर्मवर पेरेंट्स कंट्रोल सुविधादेखील उपलब्ध आहे. तुमची मुले नियमितपणे वापरत असलेले ॲप्स नियंत्रित करण्यासाठी तुम्ही याचा वापर करू शकता.

**मुलांना इंटरनेट सुरक्षिततेबद्दल शिकवा**


हे सर्वात महत्त्वाचे काम आहे. कारण मुलांच्या ॲक्टिव्हिटीवर लक्ष ठेवणे सोपे काम नाही. अशात, मुलांना इंटरनेटवरील धोक्यांची माहिती देणे आणि त्यांना इंटरनेट वापरण्याच्या योग्य मार्गांची जाणीव करून देणे आवश्यक आहे. यासोबतच मुलांना ऑनलाइन पेमेंट आणि मालवेअरच्या धोक्यांबाबत आवश्यक माहिती दिली पाहिजे.

**स्वतंत्र ई-मेल आयडी तयार करा :**

तुम्ही मुलांसाठी वेगळा ई-मेल आयडी देखील तयार करू शकता, त्यामुळे वेब ब्राऊझिंग दरम्यान अनावश्यक जाहिराती टाळता येतील. यासोबतच तुमची मुलं कोणत्या प्रकारचा कंटेन्ट पाहत आहे याची अचूक माहितीही तुम्हाला मिळेल. त्याच वेळी, नवीन ई-मेल आयडीवरून ब्राऊझरच्या मदतीने तुम्ही असुरक्षित वेबसाइट आणि कुकीज बंद करू शकता.

# स्मरणशक्ती वाढवण्यासाठी 'हाकिनी योगमुद्रा' उपयुक्त

**नववर्षाचा** उल्लास आता सरला आहे आणि विद्यार्थी वर्गाला आता वेध लागले आहेत ते लवकरच येणार असलेल्या वार्षिक परीक्षांचे. सर्वसाधारणपणे मार्च ते एप्रिल महिन्यांच्या दरम्यान होणार असलेल्या या परीक्षांची तयारी, विद्यार्थी आतापासून करण्यास सुरुवात करीत असतात. पालकही या काळामध्ये मुलांच्या खाण्या-पिण्याची, त्याच्या तब्येतीची काळजी घेण्यामध्ये कोणतीही कसर बाकी ठेवत नाहीत. या काळामध्ये मुलांची स्मरणशक्ती चांगली राहावी याकरिता योग्य आहार, नियमित आणि पुरेशी झोप मुलांना मिळणे आवश्यक असते. यामुळे शारीरिक आणि मानसिक तणाव दूर होण्यास मदत होते. मुलांची स्मरणशक्ती चांगली राहावी, याकरिता योगसाधनेची मदतदेखील घेता येऊ शकेल. मेंदू सक्रिय राहून स्मरणशक्ती चांगली राहावी याकरिता योगसाधनेमध्ये हाकिनी मुद्रा सांगितली गेली आहे. एखाद्या गोष्टीचा विसर पडत असल्यास ही मुद्रा लावून त्या वस्तूचे स्मरण करण्याचा प्रयत्न केल्याने ती गोष्ट आठवण्याची शक्यता मोठी असते. विद्यार्थ्यांच्याखेरीज ज्यांना वारंवार काही ना काही गोष्टी विसरण्याची सवय असते, त्यांच्यासाठी देखील ही मुद्रा लाभदायी आहे. ही मुद्रा करण्यासाठी दोन्ही हातांच्या पाचही बोटांचे अग्रभाग जुळवावे. त्यानंतर डोळे वरच्या बाजूला फिरवून त्यांवर अगदी हलका ताण द्यावा. श्वास घेत आपली जीभ हिरड्यांना टेकवावी. त्यानंतर श्वास सोडत जीभ पूर्वस्थितीत आणावी. ही मुद्रा करताना श्वासोच्छ्वास दीर्घ असावा. विद्यार्थ्यांकरिता स्मरणशक्ती वाढवण्याच्या दृष्टीने ही मुद्रा अतिशय लाभदायक आहे.



# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका वादाच्या भोवऱ्यात




अॅड. असीम सरोदे यांनी पत्रकार परिषदेत महाराष्ट्रातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत विधानसभा निवडणुकीतील शंकास्पद मतदार यादी वापरण्याबाबत चिंता व्यक्त केली आहे.

**■मुंबई :** महाराष्ट्रातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये विधानसभा निवडणुकीतील मतदार याद्याच वापरल्यास, तो 'बोगस मतदारांच्या भरवशावर निवडणूक जिंकण्याच्या भ्रष्ट प्रयोगाची पुनरावृत्ती' ठरेल, असे मत अॅडव्होकेट असीम सरोदे यांनी आज पत्रकार परिषदेत व्यक्त केले. यावेळी अॅड. श्रीया आवले, अॅड. बाळकृष्ण निढाळकर, अॅड. अरहंत धोत्रे आणि अॅड. रोहित टिळेकर हे उपस्थित होते.

**अॅडव्होकेट असीम सरोदे नेमकं काय म्हणाले?**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची असली तरी, अंतिम मतदार यादी केंद्रीय निवडणूक आयोगाने निश्चित केलेलीच वापरावी लागते. या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक आयुक्तांनी केंद्रीय निवडणूक आयोगाकडे विधानसभा निवडणुकीत वापरलेली मतदार यादी मागवली आहे. याचा अर्थ, विधानसभा निवडणुकीदरम्यान तयार केलेल्या शंकास्पद मतदार याद्यांचा वापर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत होण्याची शक्यता असल्याचे अॅड. सरोदे यांनी नमूद केले.

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत जे आश्चर्यकारक निकाल आले. त्यामागे मतदार याद्यांमधील भ्रष्टाचार असल्याचे कागदोपत्री पुरावे अनेक निवडणूक याचिकांमधून उच्च न्यायालयात मांडण्यात आले आहेत, असे अॅड. सरोदे म्हणाले. २८८ विधानसभा मतदारसंघांपैकी जवळपास १०० मतदारसंघांतील निवडणूक निकालांना उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. यापूर्वी इतक्या मोठ्या प्रमाणात असे शंकास्पद निकाल आले नव्हते, हे वास्तव असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

**हा मोठा प्रशासकीय अन्याय**

मतदार याद्या अद्ययावत आणि निशंक स्वरूपात तयार करणे ही निवडणूक आयोगाची जबाबदारी आहे. मतदार याद्या शंकास्पद नसतील तरच निवडणुका मोकळ्या आणि प्रामाणिक वातावरणात आयोजित होऊ शकतात. अॅड. श्रीया आवले यांनी यावेळी माहिती दिली की, २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात एकूण मतदार संख्या ९.७३ कोटी होती, तर त्यानंतर झालेल्या मतदार नोंदणीनुसार आता मतदारांची संख्या ९.८० कोटी आहे. याचा अर्थ, जर जुनीच यादी वापरली गेली, तर तब्बल ७ लाख नवमतदार मतदानापासून वंचित राहतील. मतदार म्हणून नोंदणी झालेली असतानाही मतदानाच्या कायदेशीर हक्कापासून वंचित राहणे, हा मोठा प्रशासकीय अन्याय ठरेल, असे अॅड. आवले यांनी सांगितले.

ज्या मतदार यादीवर कागदोपत्री पुराव्यांच्या आधारे व्यापक कायदेशीर आक्षेप उच्च न्यायालयात घेण्यात आले आहेत, त्याच मतदार यादीला ग्राह्य मानून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेणे हे 'सरकार व प्रशासन पुरस्कृत बेकायदेशीरता' ठरेल. ''स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यांत घ्या,'' असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत, याचा अर्थ कोणत्याही बेकायदेशीर प्रक्रियेने आणि शंकास्पद मतदार याद्यांच्या आधारे निवडणुका घ्याव्यात, असा मुळीच नाही, असेही अॅड. सरोदे यांनी स्पष्ट केले.

**मतदार नोंदणी नियमांचे उल्लंघन?**

अॅड. श्रीया आवले यांनी मतदार नोंदणी नियम १९६० चा संदर्भ देत सांगितले की, विधानसभा निवडणुकीत नाव नोंदविण्याची प्रक्रिया नियम १३ (१) व २६ मध्ये नमूद आहे. तसेच, मतदार यादीतून नाव वगळण्यासाठी किंवा नावावर आक्षेप घेण्यासाठी नियम १३ (२) व २६ नुसार प्रक्रिया सांगितली आहे. नाव रद्द करायचे असल्यास, आधी त्याचे पडताळणी झाली पाहिजे, त्याचा एक 'अकनॉलेज नंबर' तयार झाला पाहिजे आणि संपूर्ण शहानिशा झाल्यावरच नाव वगळले पाहिजे. परंतु, असे काहीही झाले नाही, आणि निवडणूक संदर्भात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना अशी कोणतीही प्रक्रिया करायची नाही, असे बजावण्यात आले होते, असा गंभीर आरोप त्यांनी केला. अशा अपारदर्शक पद्धतीने ज्या मतदार याद्या बदलण्यात आल्या किंवा तयार करण्यात आल्या, त्याच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत कायम ठेवणे म्हणजे 'दिवसाढवळ्या प्रामाणिक नागरिकांची होणारी फसवणूक आणि संविधानाशी केलेली गद्दारी' ठरेल, असेही अॅड. आवले म्हणाल्या.

# वसई-विरार शहरात ३३ ठिकाणी दरड कोसळण्याची भिती



**■विरार :** वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये ३३ ठिकाणी दरड कोसळण्याच्या घटना घडू शकतात, अशा संभाव्य अपघातजन्य ठिकाणांची यादी पालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रशासनाने जाहीर केली आहे. यामुळे वसई-विरार शहरातील निश्चित केलेल्या जागांना दरड कोसळण्याचा धोका कायम असल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे. पावसाळ्यात होणाऱ्या अतिवृष्टीमुळे भूस्खलन आणि दरड कोसळण्याच्या घटना घडतात. अशा घटना रोखण्यासाठी वसई-विरार महापालिकेने सर्वेक्षण करून दरड प्रवण क्षेत्र निश्चित केली आहेत. यावर्षी केलेल्या सर्वेक्षणात दरड प्रवण क्षेत्रात वाढ झाली असून शहरात ३३ ठिकाणे भूस्खलन आणि दरड प्रवण क्षेत्र घोषित करण्यात आली असून अशा ठिकाणांवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे.

वसई-विरार शहरातील बहुतांश भाग हा डोंगर परिसराचा आहे. या डोंगराच्या पायथ्याशी आणि डोंगरावरही नागरिकांच्या वस्त्या आहेत. तर काही ठिकाणी डोंगर पोखरून अगदी डोंगराच्या जवळपास भूमाफियांनी चाळी उभारल्या आहेत. अशा ठिकाणी सुद्धा मोठ्या संख्येने नागरी वस्ती आहे. काही वेळा पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे डोंगर भागातील माती पोकळ होऊन भूस्खलन होणे, दरड कोसळणे अशा घटना घडत असतात.यापूर्वी सुद्धा वसई पूर्वेच्या राजावळी-वाघराळपाडा येथे दरड कोसळण्याची घटना घडली होती. पावसाळ्यात अशा घटना घडू नये यासाठी महापालिका सज्ज झाली आहे. महापालिकेने शहरातील डोंगर माथ्याचे परिसर आणि डोंगराला लागून असलेल्या भागांचे सर्वेक्षण केले आहे. यात शहरात ३३ ठिकाणे ही धोकादायक असून अशा ठिकाणी भूस्खलन आणि दरड कोसळण्याची शक्यता आहे.

**अशी आहेत दरड प्रवण क्षेत्र**

मोरेगाव डोंगर नालासोपारा (पूर्व), कारगिल नगर टेपाचा पाडा. जिवदानी पाडा, आण्णा पाडा, राक्षसी पाडा, साईनाथ झोपडपट्टी, वैष्णव जिवदानी कॉम्प्लेक्स विरार पूर्व, जोसना अपार्टमेंट साईनाथ नगर, वनोठा पाडा, आचोळे डोंगरी, पडखळ पाडा, तुळींज सेवालाल नगर, निळेगांव डोंगरी, नालासोपारा(प), संतोषभवन,शिर्डीनगर, कानुपाडा, वालईपाडा, पाच आंबा, आझाद नगर, विष्णु नगर,शांतीनगर नवजिवन, गडगापाडा, धानिव, शिरसाड, इंदिरानगर वसाहत, बिलालपाडा, अलंगपाडा, सातीवली खिंड, गोखिवरे भागपाडा, गोखिवरे, बंजार पाडाभोयदापाडा, सातीवली डोंगरी, राजावळी, वाघरालपाडा, जानकीपाडा, गोखिवरे अशा 33 ठिकाणे पालिकेने दरड प्रवण क्षेत्र म्हणून घोषित केली आहेत. यातील सर्वाधिक दरड प्रवण क्षेत्र ही पेल्हार आणि वालीव या दोन प्रभाग समिती कार्यक्षेत्रात येत आहे.

म्हणून महापालिकेने अशा ठिकाणांना भूस्खलन आणि दरड प्रवण क्षेत्र घोषित केले आहे. मागील वर्षी १५ ठिकाणे होती. यावर्षी ३३ ठिकाणांची नोंद केली आहे. अशा ठिकाणांवर पालिकेने विशेष लक्ष केंद्रित केले असून त्या ठिकाणी जनजागृती करणे, त्याभागात राहणाया नागरिकांची भेट घेऊन त्यांना विशेष सूचना देण्यात आल्या आहेत. याशिवाय सूचना फलक ही लावण्यात आली असल्याची माहिती महापालिकेच्या अधिकार्यांनी दिली आहे.

## कुर्ल्यातील मदर डेअरीची जागा अदानींना
# राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी

**■मुंबई :** धारावी पुनर्विकास प्रकल्पाला गती प्राप्त झाली असून साडेआठ लाख कुटुंबांपैकी पात्र ५ लाख कुटुंबीयांचे धारावीत पुनर्वसन करण्यात येणार आहे, तर उर्वरित अपात्र कुटुंबीयांचे मुलुंड, देवनार, कुर्ला येथे पुनर्वसन करण्यात येणार आहे. यासाठी कुर्ला पूर्व येथील मदर डेअरीची ८.५ हेक्टर जमीन अदानी समूहाला हस्तांतरित करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत याला मंजुरी देण्यात आली आहे. दरम्यान, याठिकाणी शाळा, रुग्णालय व शॉपिंग कॉम्प्लेक्स अशा सोयीसुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत.

दुग्ध व्यवसाय विकास विभागाच्या कुर्ला, पूर्व येथील मातृ दुग्धशाळेची जमीन धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी १४ जून २०२४ च्या शासन प्रस्तावानुसार प्रदान करण्यात आली आहे. या प्रकल्पाचे नियोजन प्राधिकरण म्हणून ही जमीन काही अटी-शर्तीवर धारावी पुनर्विकास प्रकल्प-झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना प्रदान करण्यात आली आहे.

हा प्रकल्प राबविणे अधिक सुलभ व्हावे यासाठी या प्रस्तावातील आणि जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या मसुदा करारनाम्यातील अटी व शर्ती गृहनिर्माण आणि नगरविकास विभागाच्या धोरणाशी सुसंगत करण्यास मान्यता देण्यात आली. जेणेकरून धारावीतील रहिवाश्यांच्या पुनर्वसनासाठी जास्तीत जास्त घरे उपलब्ध होऊ शकणार आहेत. धारावी पुनर्विकासात साडेआठ लाख कुटुंबांचे पुनर्वसन करावे लागणार आहे. यापैकी पाच लाख पात्र कुटुंबांचे पुनवर्सन धारावी परिसरात पुनर्वसन होणार आहे. उर्वरित साडेतीन लाख कुटुंबांचे पुनवर्सन करण्यासाठी अधिकची जमीन गरजेची असल्याने राज्य सरकारने हा निर्णय घेतला आहे.



**'सर्वांसाठी घरे' धोरणाचे पालन**

कुर्ला येथील जमीन उपलब्ध झाल्याने आणखी काही कुटुंबांचे पुनर्वसन करणे सुलभ होणार आहे. मंत्रिमंडळाच्या या निर्णयामुळे धारावीतील अपात्र नागरिकांच्या पुनर्वसनाचा मार्ग मोकळा होणार आहे. ह्यसर्वांसाठी घरेह्न या धोरणाचे पालन करताना हा निर्णय अत्यंत महत्त्वपूर्ण असून, केवळ घरेच नाही, तर शाळा, रुग्णालये, शॉपिंग कॉम्प्लेक्स अशा इतरही नागरी सुविधांचे निर्माण सुलभ होणार आहे.

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला २३ जूनपर्यंत दिबांचे नाव न दिल्यास उपोषणाला बसण्याचा इशारा




ही बाब लक्षात घेऊन दिबांचे शिष्य आणि जेएनपीटीचे माजी विश्वस्त, कामगार नेते म्हणून परिचित असलेले कॉम्रेड भूषण पाटील यांनी सरकारला २३ जूनपर्यंतची मुदत दिली आहे. तोपर्यंत विमानतळ नामकरण अधिसूचना (नोटिफिकेशन) काढली नाही तर २४ जूनपासून जासई येथे दिबांच्या पुतळ्यासमोर बेमुदत उपोषणाला बसण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. जासई हे दिबांचे गाव असल्यामुळे त्यांनी या गावाची निवड केली आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिबांचे नाव देतानाच विमानतळासाठी विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्त आणि स्थानिकांना प्रशिक्षण तसेच रोजगार द्यावा, या मागणीसाठी कॉ. भूषण पाटील बेमुदत उपोषणाला बसणार आहेत.

**■उरण :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ ऑगस्टमध्ये सुरू होण्याची चर्चा आहे. मात्र, या विमानतळाला दिवंगत लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव अद्याप दिलेले नाही. त्यामुळे सरकारने तातडीने दिबांचे नाव देण्याचे नोटिफिकेशन काढावे अन्यथा २४ जूनपासून बेमुदत उपोषणाला बसणार, असा इशारा कामगार नेते कॉम्रेड भूषण पाटील यांनी दिला आहे. २४ जून २०१३ रोजी दिबांचे निधन झाले. याला आता एक तप पूर्ण होत आहे. याचे औचित्य साधून जासईमध्ये उपोषणाला बसण्याचा इशारा कॉ. पाटील यांनी दिला आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीकडून पाच वर्षांपासून विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्याची आग्रही मागणी केली जात आहे. याबाबतचा ठराव राज्य विधिमंडळानेही दोन वेळा मंजूर करून केंद्र सरकारकडे पाठवला आहे. मात्र, केंद्राकडून होय म्हटले जात असले तरी प्रत्यक्षात कृती केली जात नाही. त्यामुळे कृती समिती संतप्त झाली आहे. सरकार दिबांचे नाव विमानतळाला देण्यास का दिरंगाई करत आहे, असा सवाल सर्वपक्षीय कृती समितीकडून विचारला जात आहे.

नवी मुंबईचा विकास होत असताना दिवंगत लोकनेते दि. बा. पाटील यांनी प्रकल्पग्रस्तांना न्याय आणि हक्क मिळवून दिला. आता त्याच भूमीवर विमानतळ होत असताना त्याला दिबांचे नाव देणे सर्वार्थाने योग्य ठरणार आहे. म्हणूनच पाच वर्षांपासून यासाठी पाठपुरावा केला जात आहे. महाविकास आघाडी सरकार आणि त्यानंतर महायुती सरकारने दि. बा. पाटील यांच्या नावाचा प्रस्ताव मंजूर करून केंद्राकडे पाठवला होता.

शिवाय कृती समितीच्या सर्व नेत्यांनी दिल्लीत ७ ऑक्टोबर २०२४ रोजी नागरी विमान वाहतूक मंत्री किंजरापू राम मोहन नायडू यांची भेट घेतली होती. त्यांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला. मग सात महिने उलटले तरी नामकरण होत नसेल तर सरकारच्या मनात नक्की काय आहे, असा सवाल विचारला जात आहे.

# धोकादायक इमारतींच्या सुरक्षेचा आढावा घेण्यासाठी समितीची स्थापना

**■भाईंदर :** मिरा रोड-भाईंदर महापालिका हद्दीतील जुन्या आणि धोकादायक इमारती घोषित करण्यासाठी निर्णय घेण्यास अडचण निर्माण झाल्यास अशा प्रकरणात निर्णय घेण्यासाठी उच्च न्यायालय रीट याचिकेच्या निर्णयानुसार महापालिकेने अधिकार्यांची नियुक्ती करुन तांत्रिक सल्लागार समिती (टेक्निकल अडवाजरी कमिटी) टीएसीची स्थापना केली आहे.

मिरा-भाईंदर महापालिका कार्यक्षेत्रातील १० जुन्या आणि धोकादायक इमारतींच्या बाबतीत दोन बांधकाम अभियंत्यांकडून दोन भिन्न संरचनात्मक अहवाल प्राप्त झाले असून हे प्रकरण तांत्रीक सल्लागार समिती (टीएसी) कडे सोपवण्यात आले आहे. या जुन्या आणि धोकादायक इमारतीची स्थळ पाहणी मंगळवारी करण्यात आली होती. पालिकेच्या अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाकडून जुन्या व मोडकळीस आलेल्या धोकादायक इमारतींच्या स्थितीचा आढावा घेण्यासाठी आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा , अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, अतिक्रमण विभागप्रमुख नरेंद्र चव्हाण आणि तांत्रिक सल्लागार समितीचे अधिकारी उपस्थित होते.



**खालील इमारतींची करण्यात आली पाहणी**

प्रभाग समिती क्र. २ मधील श्री आशीर्वाद को-ऑ. हौ .सो. लि., डिमेलो हॉटेल, स्टेशन रोड, भाईंदर (पश्चिम), न्यू पल्लवी को-ऑ. हौ .सो., ६० फूट रोड भाईंदर पश्चिम, जोसेफ को-ऑ. हा. सो. लि., ६० फूट रोड भाईंदर पश्चिम, मालिका को-ऑ. हा. सो. लि., ६० फूट रोड भाईंदर पश्चिम, न्यू गिरनार को-ऑ. हा. सो. लि., ६० फूट रोड भाईंदर पश्चिम, प्रभाग क्रमांक ४ मधील लक्ष्मी दिप को-ऑ. सो. लि., सिनेमॅक्स जवळ, कनकिया रोड, मिरा रोड, लक्ष्मी आशिष को-ऑ. हा. सो. लि., लक्ष्मी पार्क, कनकिया रोड मिरा रोड, प्रभाग क्रमांक ५ मधील बैतूल अब्बास को-ऑ. हा. सो. लि., हैदरी चौक नयानगर, मिरारोड, फातिमा मंजिल को-ऑ. हा. सो. लि., मिरा नर्सिंग होम गल्ली, नयानगर, मिरारोड, प्रभाग क्रमांक ६ मधील शितल प्लाझा को-ऑ. हा. सो. लि., शितल नगर, मिरारोड या इमारतींच्या स्थळ पाहणी दरम्यान आयुक्तांनी संबंधित इमारतीच्या भोगवटाधारक यांच्याशी संबंधित विषयावर चर्चा करून त्यांचे मत जाणून घेतले. तसेच तांत्रिक सल्लागार समितीचे अधिकारी आणि मनपा अभियंता यांना या जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींचे अहवाल तातडीने सादर करण्याबाबत सूचना केल्या.

# ठाणे शहरातील ओल्या कचऱ्याबाबत व्यापारी आस्थापनांना तंबी

**■ठाणे :** ठाणे शहरातील कचऱ्याची समस्या जटिल होत असताना पालिकेने हॉटेल, मॉल व व्यापारी आस्थापना यांना रडारवर घेतले आहे. १०० किलो पेक्षा जास्त कचरा निर्माण करणाऱ्यांना पालिकेने टार्गेट केले आहे. ओल्या कचऱ्याची विल्हेवाट आपल्याच परिसरात लावा, अन्यथा दंड भरा अशी तंबीच पालिकेने त्यांना दिली आहे.

लग्नसमारंभ कार्यालये, शैक्षणिक संस्था, हॉटेल्स, मॉल अशा ठिकाणी रोज १०० किलोपेक्षा जास्त कचरा निर्माण होतो, अशा आस्थापनांना बल्क वेस्ट जनरेटर म्हणून संबोधले जाते. अशा आस्थापनांनी कच[illegible]याची विल्हेवाट आपल्या परिसरातच करण्याचे अपेक्षित आहे. बल्क वेस्ट जनरेटरचा कचरा महानगरपालिकेद्वारे वहन करणे अपेक्षित नसल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे. त्यानुसार महापालिकेच्या घनकचरा विभागाने पहिल्या टप्प्यात शहरातील ७० आस्थापनांना महापालिकेने नोटीस बजावली असून पुढील १५ दिवसात कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचे निर्देश दिले आहेत. परंतु तसे न केल्यास दंडाच्या कारवाईला सामोरे जाण्याचा इशारा दिला आहे.



# पहिल्याच मोठ्या पावसात वसई-विरारमधील व्यवस्थेची पोलखोल



**■विरार :** वसई-विरार शहरात बुधवारी सकाळपासूनच पावसाने दमदार हजेरी लावली होती. नुकत्याच सुरुवात झालेल्या पावसामुळे शहरातील सखल भागात पाणीच पाणी साचले होते. यामुळे शहरातील वाहतुकीवर मोठा परिणाम झाला होता. तर पालिकेच्या रखडलेल्या कामामुळे शहरातील रस्त्यावर चिखल पसरला होता. सकाळच्या वेळी सुरू झालेला पाऊस दुपारपर्यंत जोरात सरी सुरूच राहिल्या होत्या. यामुळे शहरातील अनेक मुख्य रस्ते पाण्याने भरले होते. विशेषतः विरारच्या चंदसार, साईनाथ, वीर सावरकर मार्ग, जीवदानी रोड, नालासोपारा प्रगती नगर, नालासोपारा अचोले रोड, तसेच वसईच्या अनेक ठिकाणी रखल भागांमध्ये पाणी साचले होते.

यामुळे नागरिकांना पयार्यी पायी प्रवास करत चालत जावे लागले. काही ठिकाणी पाण्याचा प्रवाह इतका तीव्र होता की वाहनचालकांना आपली वाहने फुटपाथवर उभी करावी लागली होती. तर पालिकेच्या अर्पुया पाणी निचरा व्यवस्थेमुळे पाणी तासनतास साचून राहिले होते. रस्त्यांवर साचलेले पाणी आणि चिखलामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागला. अनेक नागरिकांनी पालिकेच्या कामकाजाबाबत नाराजी व्यक्त केली आहे.

तथापि, अचानक झालेल्या मुसळधार पावसामुळे वसई-विरार शहरातील नागरिकांना मोठी गैरसोय झाली. पुढील काही दिवसातही पावसाचा अंदाज असल्याने प्रशासनाने पूर्वतयारी करून ठेवण्याची गरज आहे. निवारण उपायांच्या अभावामुळे यासारख्या घटना पुन्हा पुन्हा घडत राहण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पालिकेने आपल्या पाणी निचरा व्यवस्थेत सुधारणा करणे आणि नागरिकांना मदत करण्याची जबाबदारी पार पाडणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे.

# ठाण्यात पुन्हा टोइंग व्हॅनचे वादळ...
## ६ महिन्यांत सुरू करण्याच्या हालचाली, राजकीय पक्षांचा कडाडून विरोध

**■ठाणे :** ठाण्यात सहा महिन्यानंतर पुन्हा टोइंग व्हॅन सुरू करण्याचा हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत. परंतु वाहतूक विभागाच्या या निर्णयाविरोधात दक्ष नागरिकांबरोबरच आता राजकीय पक्षही मैदानात उतरले आहेत. भाजपने ही सेवा न सुरू करण्यासाठी वाहतूक विभागाला निवेदन दिले आहे. तर उद्धव सेना टोइंग व्हॅनविरोधात मैदानात उतरली आहे. त्यांनी देखील गुरुवारी वाहतूक विभागाला निवेदन देऊन याचा निषेध केला.

ठाण्यात मागील सहा महिन्यापासून टोइंग व्हॅन बंद होत्या. परंतु त्यामुळे कुठेही कसल्याही प्रकारची कोंडी झालेली दिसून आली नाही. आता मात्र वाहतूक विभागाकडून पुन्हा टोइंग व्हॅन सुरू करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. दक्ष नागरिक अजय जया यांच्यासह संगम डोंगरे यांनी आवाज उठविण्यास सुरवात केली असून वाहतूक विभागाच्या या कृतीचा निषेध केला आहे.

**उद्धव सेनेचा आंदोलनाचा इशारा**

भाजपपाठोपाठ गुरुवारी उद्धव सेनेने देखील टोइंग व्हॅनच्या विरोधात आपला आवाज बुलंद केला आहे. सायंकाळी उद्धव सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी वाहतूक पोलीस उपायुक्तांना निवेदन देत टोइंग व्हॅन सुरू करू नका, अशी भूमिका घेतली आहे. अन्यथा आंदोलन केले जाईल, असा इशारा दिला आहे.

**भाजपकडून निवेदन**

दक्ष नागरिक अजय जया यांच्यासह संगम डोंगरे यांनी आवाज उठविण्यास सुरवात केली असून वाहतूक विभागाच्या या कृतीचा निषेध केला आहे. तसेच ही सेवा सुरू केल्यास आंदोलन करण्याचा इशारा देखील त्यांनी दिला आहे. दुसरीकडे दक्ष नागरिकांबरोबरच आता भाजपनेही वाहतूक विभागाच्या या कृतीविरोधात आवाज उठविला आहे. माजी शहर अध्यक्षा मृणाल पेंडसे आणि सुनेश जोशी यांनी या संदर्भात वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त पंकज शिरसाठ यांची भेट घेऊन त्यांना एक निवेदन सादर केले आहे.



ई-चलानची व्यवस्था आधीच सुरू असताना, मग टोइंग व्हॅनची गरज काय? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. दुसरीकडे, स्टेशनवरून धावणाऱ्या शेअर ऑटोमध्ये ५-५ प्रवाशांना नेले जाते, मात्र त्यांच्यावर कुठेही कारवाई होताना दिसत नाही. शहरात अनेक ठिकाणी बेकायदेशीर रिक्षा स्टँड बांधले गेले आहेत, जिथे चालकांची दादागिरी ही एक सामान्य गोष्ट बनली आहे. कार डेकोर आणि इतर दुकानांच्या बाहेर बेकायदेशीर पार्किंग होत आहे, परंतु त्याकडे कोणाचेही लक्ष जात नाही, किंवा कारवाई होतांना दिसत नाही. वाहतूक विभागाने सम-विषम पार्किंग धोरण लागू केले असतानाही त्याचे पालन होताना दिसत नाही. त्यामुळे या समस्या आधी सोडव्यात, अशी मागणी मृणाल पेंडसे यांनी केली आहे. एकूणच यावर तोडगा निघाला नाही तर तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशाराही त्यांनी या निवेदनाच्या माध्यमातून दिला आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by Dr. Mr. Deepak Moreshwar Naik. Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com